रविवार, ३० ऑक्टोबर २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक १०२
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## आदित्य ठाकरे यांना सरकार गेल्याचा राग -ना. सामंत



**ठाणे :** राज्यात २५,३६८ कोटींच्या १० प्रकल्पांना मागील तीन महिन्यांत आम्ही मान्यता दिली. त्यामुळे रोजगार निर्मिती होणार आहे. कॅबिनेट सब कमिटीची बैठक झाली आणि आम्ही या प्रकल्पांना मान्यता दिली, असे सांगत राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी शनिवारी (दि. २९) आदित्य ठाकरेंना जोरदार प्रत्युत्तर दिले. टाटा एअरबस आणि वेदांता फॉक्सकॉन प्रकल्पाबाबतची कागदपत्रे त्यांनी पत्रकार परिषदेत दाखवत महाविकास आघाडीवर निशाणा साधला. या वेळी त्यांनी दोन्ही प्रकल्प महाराष्ट्रातच राहावेत यासाठी महाविकास आघाडी सरकारने कोणतेही प्रयत्न केले नसल्याचा आरोपही केला. आदित्य ठाकरे यांना सरकार गेल्याचा राग आहे, पण राग किती काढायचा? यालाही बंधने आहेत, असा टोला मंत्री सामंत यांनी लगावला.

### अंतरंग
उद्धवजी, औरंगजेबी स्वप्न मराठी माणसावर का लादता?/२
चौक येथे परस्पर विकल्या चारचाकी; गुन्हा दाखल/५
टी-२० वर्ल्डकप : न्यूझीलंडचा श्रीलंकेवर मोठा विजय/८

# राज्यात रखडलेल्या विकासाला गती

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रतिपादन



**नंदुरबार : प्रतिनिधी**

गेल्या अडीच वर्षांत राज्यात विकासकामे मंदावली होती. त्याला गती देण्याचे काम सध्याच्या सरकारकडून केले जात आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी (दि. २९) नंदुरबार येथे केले. ते नगर परिषदेच्या नव्या प्रशासकीय इमारतीच्या लोकार्पण सोहळ्यात बोलत होते.

या सोहळ्याला आदिवासी विकासमंत्री तथा नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. विजयकुमार गावीत, पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील, कृषीमंत्री अब्दुल सत्तार, बंदरे व खनिकर्ममंत्री दादाजी भुसे, खासदार डॉ. हिना गावीत, राजेंद्र गावीत, आमदार किशोर दराडे, किशोर पाटील, मंजुळा गावीत, राजेश पाडवी, शिरीष नाईक, चिमणराव पाटील, काशिराम पावरा, नगराध्यक्ष रत्ना रघुवंशी यांच्यासह लोकप्रतिनिधी व अधिकारी उपस्थित होते. या वेळी मुख्यमंत्र्यांनी राज्य सरकारच्या विकास योजनांची माहिती दिली तसेच विरोधकांवर निशाणा साधला.

विशेष म्हणजे मुख्यमंत्री शिंदे यांनी आपल्या भाषणाची सुरुवात अहिराणी भाषेतून केली. त्यास उपस्थितांनी टाळ्या वाजवत दाद दिली. मुख्यमंत्री म्हणाले की, हे जनतेच्या मनातील सरकार आहे. २०१९ साली शिवसेना-भाजपचे सरकार यायला हवे होते. तेच सरकार मागील तीन महिन्यांपूर्वी आलेले आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना अनेक मोठे प्रकल्प सुरू झाले, पण दुर्दैवाने कोरोना तसेच इतर कारणांमुळे ही कामे नंतर थांबली होती. या कामांना चालना देण्याचे काम आम्ही केले.

### महाराष्ट्रात मोठे उद्योग येणार

महाराष्ट्रात भविष्यात मोठ मोठे उद्योग येतील आणि राज्याची भरभराट होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही महाराष्ट्रात उद्योग देण्याचे आश्वासन दिले आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या वेळी सांगितले. राज्यात टाटा एअरबस प्रकल्पावरून जो काहूर माजवण्याचा प्रयत्न सुरू आहे, त्याला उत्तर उद्योगमंत्री देत आहेत. योग्य वेळी मीसुद्धा उत्तर देईन, परंतु भविष्यात राज्यामध्ये मोठे उद्योग आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह यांच्याशी मी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चर्चा केली आहे. राज्यातील तरुणांच्या हाताला रोजगार मिळविण्यासाठी आमचे सरकार प्रयत्नशील आहे, असेही ते म्हणाले.



### काही लोक आता बांधावर जाताहेत

राज्यात नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात आले. जून, जुलै, ऑगस्ट महिन्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले होते. अशा शेतकऱ्यांना तत्काळ मदतीचे वाटप करण्यात आले. शेतकऱ्यांच्या खात्यात अडीच हजार कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. काही लोक आता बांधावर जात आहेत. ठीक आहे, गेले पाहिजे. शेवटी काम तर करायलाच पाहिजे. सरकारमध्ये असलेल्यांनी आणि बाकी लोकांनीपण, असा टोला मुख्यमंत्री शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना त्यांचे नाव न घेता लगावला. या कार्यक्रमानंतर मुख्यमंत्र्यांनी माध्यमांशीही संवाद साधला. या वेळी त्यांनी आदित्य ठाकरेंच्या टीकेला प्रत्युत्तर दिले. शेतकऱ्यांना आम्ही जी नुकसानभरपाई दिली ती आजवरच्या इतिहासातील सर्वांत मोठी आहे. जे शेतकरी निकषात बसत नव्हते त्यांनाही आम्ही मदत देण्याचा प्रयत्न केला आहे. आम्ही सहा हजार कोटींची नुकसानभरपाई दिली. त्यामुळे त्यांनी आकडे पहावे आणि टीका करावी, असे मुख्यमंत्री म्हणाले.

## अभियांत्रिकी पदविका परीक्षेत पेणचा स्वरूप शेळके राज्यात प्रथम



(छाया : अनिस मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

पेण शहरातील स्वरूप सुदर्शन शेळके या विद्यार्थ्याने अभियांत्रिकी पदविका परीक्षेत ९९.७०% गुण मिळवून महाराष्ट्र राज्यात पहिला येण्याचा मान पटकाविला आहे. स्वरूपने माणगावच्या लोणेरे येथील इन्स्टिटयूट ऑफ पेट्रोकेमिकल इंजिनियरिंग (बाटू) या कॉलेजमधून इलेक्ट्रिकल इंजिनियरिंगची पदविका प्राप्त केली आहे.

विशेष म्हणजे कोणत्याही खासगी कोचिंग क्लासला न जाता कॉलेजव्यतिरिक्त दिवसातून तीन ते चार तास अभ्यास करून हे यश मिळविल्याचे स्वरूप शेळके याने सांगितले. या यशात कॉलेजचे प्रिन्सिपल डॉ. मधुकर दाभाडे, डॉ. नितीन लिंगायत, प्रा. दीपिका शेट यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले तसेच कॉलेजने मला संशोधनासाठी पीएलसी लॅब उपलब्ध करून दिल्यानेच पीएलसी सिस्टीमवर आधारित स्वतंत्र प्रोग्राम तयार करण्यात मला यश प्राप्त झाले आहे, असे सांगून भविष्यात यूपीएससी परीक्षा देऊन देशसेवा करण्याचा मानस स्वरूप शेळकेने व्यक्त केला.

कॉलेजमधील नऊ विद्यार्थ्यांना काही विषय मागील सुमारे दोन वर्षांपासून सोडविता आले नव्हते. या विद्यार्थ्यांना स्वरूपने स्वतःच्या पद्धतीने अभ्यासक्रम शिकविला. त्यामुळे स्वरूपची अभ्यासाची रिव्हिजन तर झालीच, शिवाय या नऊ विद्यार्थ्यांनाही परीक्षेत यश प्राप्त करता आले, असे स्वरूपची आई व नॅशनल कॉम्प्युटरच्या संचालिका स्मिता शेळके यांनी सांगितले.

(छाया : अमित जाधव)



**पनवेल : न्हावेखाडी येथे लोकनेते रामशेठ ठाकूर उद्यानाचे (रामबाग) काम सुरू असून या अंतर्गत शनिवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी ग्रामपंचायत सदस्य सागरशेठ ठाकूर, ज्येष्ठ कार्यकर्ते अरुणशेठ ठाकूर, सी. एल. ठाकूर, राम मोकल, सदाशिव ठाकूर, सुजित ठाकूर, सतिश ठाकूर आदी उपस्थित होते.**

### निवडक

#### सरकारने साखर निर्यातबंदी आणखी एक वर्ष वाढवली

**नवी दिल्ली :** देशांतर्गत बाजारपेठेत साखरेची उपलब्धता कायम ठेवण्यासाठी केंद्र सरकारने साखरेच्या निर्यातीवरील निर्बंध पुढील वर्षी ३१ ऑक्टोबरपर्यंत वाढवले आहेत. साखर निर्यातीवरील निर्बंध ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी संपणार होते, पण परकीय व्यापार महासंचालनालयाने (डीजीएफटी) आता त्यास एक वर्षासाठी मुदतवाढ दिली आहे.

#### इम्रान खान यांची भारतावर पुन्हा स्तुतीसुमने

**लाहोर :** पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांनी शहबाज शरीफ सरकारवर केली आहे. पाकिस्तानी सरकारच्या विरोधात इम्रान यांनी लाहोर ते इस्लामाबाद अशा 'लाँग मार्च'चे आयोजन केले आहे. या वेळी त्यांनी पुन्हा एकदा भारतीय परराष्ट्र धोरणाचे जाहीर कौतुक केले आहे तसेच मला जास्त बोलायला लावू नका, अशा इशाराही त्यांनी आयएसआयच्या प्रमुखांना दिला.

## राष्ट्रवादीने आघाडी सरकारचा पाठिंबा काढून घेतल्यामुळे राज्यात भाजपची सत्ता आली

### काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांचा आरोप



**कराड : प्रतिनिधी**

राज्यात सन २०१४मध्ये आघाडीचे सरकार कार्यरत असताना राष्ट्रवादी काँग्रेसने विधानसभा निवडणुकीपूर्वी अचानकपणे सरकारचा पाठिंबा काढून घेतला. त्यामुळे सरकार पडले. त्यानंतर महाराष्ट्रातील भाजप वाढण्यास, सत्तेत येण्यास मदत झाली. देवेंद्र फडणवीस यांचे सरकार राष्ट्रवादीमुळेच आले, असा आरोप राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. ते कराडमध्ये पत्रकार परिषदेत बोलत होते.

चव्हाण म्हणाले की, राज्यात सन २०१४मध्ये आघाडी सरकारवर टीका करीत राष्ट्रवादी काँग्रेस ही सत्ता आणि आघाडीपासून दूर झाली. त्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसने हे सरकार पाडले नसते तर पुन्हा आघाडीचेच सरकार सत्तेत आले असते, मात्र तसे न झाल्यामुळे याचा फायदा भाजपला झाला.

दरम्यान, काँग्रेस पक्षाध्यक्षपदाची निवडणूक लोकशाही मार्गाने झाल्यामुळे 'जी २३'चा मुख्य हेतू सफल झाला, पण निर्णयाला उशीर झाल्याने अनेक जण पक्ष सोडून गेल्याची खंत चव्हाण यांनी व्यक्त केली. काँग्रेसमध्ये २२ वर्षांनंतर पक्षांतर्गत निवडणुका झाल्या. तशी आमची मागणी होती. आम्ही ती लावून धरली नसती तर कदाचित अजूनही अशा निवडणुका झाल्या नसत्या, असेही चव्हाण यांनी म्हटले.

राहुल गांधींची भारत जोडो यात्रा महाराष्ट्रात आल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे त्यात सहभागी होणार का? याबाबत विचारले असता त्यांना निमंत्रण दिले गेले आहे. ही यात्रा तिरंगा झेंड्याखाली होत आहे, पण यात सहभागी व्हायचे की नाही हा त्यांचाच निर्णय असेल, असे चव्हाण यांनी सांगितले.

## गुजरातमध्ये समान नागरी कायदा लागू होणार

[ समितीची स्थापना ]

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**



पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यापासून प्रेरणा घेऊन गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. राज्यात समान नागरी कायदा लागू करण्यासाठी समिती स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली आहे. राज्याचे गृहमंत्री हर्ष संघवी यांनी ही माहिती दिली.

मंत्रिमंडळाच्या या निर्णयाची माहिती देताना केंद्रीय मंत्री पुरुषोत्तम रुपाला म्हणाले की, गुजरातमध्ये समान नागरी संहिता (यूसीसी) लागू करण्यासाठी समितीचे अध्यक्ष उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश असतील आणि त्यात तीन ते चार सदस्य असतील.

## देशात ई-हायवे बनविण्याचा प्लॅन -ना. नितीन गडकरी

**मुंबई : प्रतिनिधी**

देशात ई-हायवे बनविण्याचा आमचा प्लॅन आहे. त्यासाठी तुमची मदत हवीय, असे प्रतिपादन केंद्रीय परिवहनमंत्री नितीन गडकरी यांनी म्हटले आहे. मुंबई आयआयटीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. या संदर्भात रिसर्च करा. मी त्याला इन्करेज करतो, असेही त्यांनी सांगितले.



विद्वान बनणे आणि चांगला व्यक्ती बनणे हे खूप वेगळे आहे. ज्ञानासोबत संस्कारसुद्धा महत्त्वाचे आहेत, असे सांगून ऊर्जा संकट सगळ्यात मोठी समस्या असल्याचे ना. नितीन गडकरी या वेळी म्हणाले. सार्वजनिक वाहतूक वाढवायला हवी. त्याला प्राधान्य देणे गरजेचे आहे. जर सगळ्या गोष्टी लोकांना पब्लिक ट्रान्सपोर्टने दिल्या तर त्याचा वापर होईल, असे मतही त्यांनी व्यक्त केले.

पुढच्या महिन्यात ई-बसनंतर ई-ट्रक लॉन्च करणार असल्याची माहिती या वेळी ना. गडकरी यांनी दिली तसेच मला पेट्रोल-डिझेलला हद्दपार करायचे आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

आयआयटीसमोर मेट्रोचे काम सुरू आहे. मेट्रो, ब्रिजमधील दोन पिलरमध्ये आपल्याकडे ३० मीटर अंतर आहे, तर मलेशियामध्ये १०२ मीटर आहे. फायबर स्टीलचा वापर तिथे केला जातो, ज्यामुळे कॉस्ट कमी होते. हा तंत्रज्ञानाचा वापर आपण केला पाहिजे, असे आवाहन ना. गडकरींनी केले.



**पनवेल : वरुणराजाने निरोप घेतल्याने दिवाळीनंतर शेतीकामांना वेग आला आहे. शिवारात पिकविलेल्या भातपिकाची झोडणी करण्यात शेतकरीवर्ग सध्या गर्क आहे.** (छाया : लक्ष्मण ठाकूर)

## आज भारताचा सामना द. आफ्रिकेशी

**पर्थ : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाचा पुढील सामना रविवारी (दि. ३०) दक्षिण आफ्रिकेविरुद्ध आहे. संघाने सलग दोन सामने जिंकल्याने टीम इंडियाच्या खेळाडूंचे मनोबल वाढले आहे.

सुपर १२च्या ग्रुप-२मध्ये भारताने पाकिस्तान आणि नेदरलँड्सचा पराभव करून गुणतालिकेत चार गुणांसह अव्वल स्थान पटकाविले आहे, तर दक्षिण आफ्रिका दोन सामन्यांत तीन गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. आफ्रिकेने मागील सामन्यात बांगलादेशचा पराभव केला, मात्र झिम्बाब्वेविरुद्धचा त्यांचा सामना पावसामुळे वाहून गेला होता.

पर्थमध्ये भारतीय प्रमाण वेळेनुसार संध्याकाळ साडेचार वाजता सुरू होईल. वेदरडॉटकॉमनुसार रविवारी संध्याकाळी ७ वाजल्यापासून पर्थमध्ये पावसाची शक्यता नाही. रात्री नऊनंतर दोन टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे. सामन्यादरम्यान पर्थमधील तापमान १३ अंश सेल्सिअसच्या आसपास असेल. त्यामुळे दोन्ही संघ कडाक्याच्या थंडीत सामने खेळतील.

### टी-२० वर्ल्डकप



**भारतीय संघ :** रोहित शर्मा (कर्णधार), केएल राहुल, विराट कोहली, सूर्यकुमार यादव, हार्दिक पांड्या, दिनेश कार्तिक (यष्टीरक्षक), अक्षर पटेल, रविचंद्रन अश्विन, भुवनेश्वर कुमार, मोहम्मद शमी, अर्शदीप सिंग, हर्षल पटेल, ऋषभ पंत, युझवेंद्र चहल, दीपक हुडा.

**दक्षिण आफ्रिकेचा संघ :** क्विंटन डी कॉक (यष्टीरक्षक), टेम्बा बावुमा (क), रिले रोसो, एडन मार्कराम, डेव्हिड मिलर, ट्रिस्टन स्टब्स, वेन पारनेल, केशव महाराज, कागिसो रबाडा, ॲनरिक नॉर्टजे, लुंगी एनगिडी, हेनरिक क्लासेन, तबरेझ शम्सी, रीझा हेंड्रिक्स, मार्को हेंड्रिक्स, मार्को यानसेन.

## पोलीस भरती पुढे ढकलली

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात नोव्हेंबरमध्ये होणारी पोलीस भरती पुढे ढकलण्यात आली आहे. राज्यभरात तब्बल १४९५६ पदांसाठी १ नोव्हेंबरपासून भरती प्रक्रियेला सुरुवात होणार होती. याला तात्पुरत्या स्वरुपात स्थगिती दिली गेली असून या भरतीबाबत पुढील आठवड्यात निर्णय घेण्यात येणार आहे.

मागील तीन वर्षांमध्ये पोलीस भरती झालेली नव्हती. वयोमर्यादा संपल्यामुळे अनेकजण पोलीस भरतीसाठी पात्र नाहीत. अशा तरुणांना संधी मिळावी, त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ नये यासाठी ही पोलीस भरती थोड्या कालावधीसाठी स्थगित करण्यात आल्याचे समिती आणि सरकारकडून कळतेय. त्यामुळे पुढील आठवड्यात पोलीस भरतीची जाहिरात निघाल्यानंतर वयोमर्यादा शिथिल करण्यात येऊ शकते.

# हिशोब तर द्यावाच लागेल!

## पेडणेकरांच्या टीकेला सोमय्यांचे प्रत्युत्तर

**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे गटातील नेत्या मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी गरीब झोपडपट्टीवासीयांचे गाळे ढापले आहेत. त्याचा हिशोब द्यावा लागेल. दबावतंत्र तर उद्धव ठाकरे वापरत होते, पण चौकशी सुरू झाली आहे. त्यामुळे पेडणेकर यांना भाऊबीज आठवत आहे, असा टोला भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी लगावला आहे. ते मुंबईत माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.



भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी किशोरी पेडणेकर यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. पेडणेकर यांनी वरळी येथील गोमाता जनता एसआरएमधील सहा गाळे (सदनिका) हस्तगत केल्याचे सोमय्या यांनी म्हटले आहे. दरम्यान, सोमय्या यांच्या या आरोपानंतर पेडणेकर यांनी दवाबतंत्राचा वापर केला जात आहे, अशी प्रतिक्रिया दिली. पेडणेकर यांच्या याच वक्तव्यावर आता सोमय्यांनीदेखील जशास तसे उत्तर दिले आहे.

किशोरी पेडणेकर यांनी २०१७ साली निवडणुकीमध्ये आपल्या शपथपत्रात एसआरएचा पत्ता दिला आहे. इमारत क्रमांक २, वरळी गोमाता जनता एसआरएमध्ये राहत असल्याचे त्यांनी आपल्या शपथपत्रात लिहिलेले आहे. पेडणेकर यांनी अर्धा डझन गाळे हस्तगत केले आहेत. त्याचा हिशोब घेण्यास सुरुवात झाली आहे. त्यांनी गरीब झोपडपट्टीवासीयांचे गाळे ढापले आहेत. आम्ही तुम्हाला गाळे देऊ, असे म्हणत लोकांकडून पैसे वसूल करण्यात आले. या संदर्भातच दादर पोलीस ठाण्याकडून चौकशी सुरू आहे. मी किशोरी पेडणेकर यांचे नाव दिलेले नाही, तर जे लोक फसलेले आहेत त्यांनीच पेडणेकर यांचे नाव घेतले आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना न्यू मरीन लाईन पोलीस ठाण्यानेही या प्रकरणाची चौकशी सुरु केली आहे, अशी माहिती सोमय्या यांनी दिली.



**मुंबईकरांना लाज वाटतेय!**

***कोरोना साथीला तत्कालीन महापौर किशोर पेडणेकर यांनी कमाईचे साधन बनवण्याचा प्रयत्न केला. मुंबईकरांना लाज वाटत आहे. कोरोना साथीला हाताळण्यासाठी पेडणेकरांनी त्यांच्याच कंपनीला कंत्राट दिले. याबाबतही पेडणेकरांनी स्पष्टीकरण द्यावे. आम्ही दबावतंत्राचा वापर केलेला नाही. उद्धव ठाकरे यांनीच दबावतंत्राचा वापर केला होता. त्यांनी सगळी चौकशी दाबून ठेवली होती. आता चौकशीला सुरुवात झालेली आहे. त्यामुळे पेडणेकर यांना भाऊबीज आठवत आहे, असा टोला भाजप नेते किरीट सोमय्या यांनी लगावला.***

## उद्धवजी, औरंगजेबी स्वप्न मराठी माणसावर का लादताय?

### भाजप नेते आमदार आशिष शेलार यांचे टीकास्त्र



**मुंबई : प्रतिनिधी**

भाजपचे मुंबई अध्यक्ष आणि आमदार आशिष शेलार यांनी शनिवारी (दि. २९) घेतलेल्या पत्रकार परिषदेत माजी मुख्यमंत्री आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर परखड शब्दांत टीकास्त्र सोडले. यासाठी त्यांनी 'सामना'मध्ये छापून आलेल्या एका वृत्ताचा संदर्भ दिला आहे.

या वेळी बोलताना आशिष शेलार यांनी उद्धव ठाकरेंचा वैचारिक लोच्या झाल्याची टीका केली आहे. उद्धवजी, तुम्ही काँग्रेस, राष्ट्रवादी आणि समाजवादी यांच्याशी युती करून वैचारिक लोचा तर केलाच आहे. त्याही पुढे पोटनिवडणुकीत लाल बावट्याकडून, कम्युनिस्टांकडूनही तुम्ही समर्थन मागितले. तुमचा प्रश्न अलहिदा आहे, पण आता मुंबई महानगरपालिकेत पराभव दिसू लागल्यावर तुम्ही समाजासमाजात विभागण्या का करीत आहात? धर्म, जात यांची पेरणी का करीत आहात? तुम्हाला काय गरज आहे त्याची? भाजपची भूमिका स्पष्ट आहे. ना जातीवर, ना धर्मावर, केलेल्या विकासकामांवर आम्ही मतांची बेगमी करू, असे शेलार म्हणाले.

या वेळी आशिष शेलार यांनी संबंधित वृत्तामध्ये केलेल्या 'मराठी मुस्लीम' या उल्लेखावर आक्षेप घेतला. २२ ऑक्टोबरला 'सामना'मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला मराठी मुस्लीम यांचे समर्थन अशी बातमी झळकली. समर्थन कुणी कुणाला द्यावे, घ्यावे तो ज्यांच्या त्यांच्या पक्षाचा प्रश्न आहे, पण खरेतर स्वत:च्या राजकीय स्वार्थासाठी मतांची पेरणी करण्याचा नवा विचार ठाकरे गटाने मांडला आहे. या समर्थनात लांगुलचालनाचा राजकीय स्वार्थी वास आहे. ही मुंबई महापालिका निवडणूक जिंकण्यासाठीची केलेली ही राजकीय पेरणी आहे. म्हणून मराठी मुस्लीम असा शब्द वापरला, असे शेलार म्हणाले.

तुम्ही 'मराठी मुस्लीम'ची मांडणी करीत आहात, मग मराठी जैन, मराठी गुजरातींशी तुमचे वैर का? मराठी उत्तर भारतीय तुम्हाला का चालत नाही? मराठी हिंदू या विषयाशी तुम्ही फारकत का घेत आहात? भाजपची भूमिका मराठी मुंबईकराची आहे, असेही आशिष शेलार यांनी नमूद केले.

दरम्यान, उद्धव ठाकरे औरंगजेबाचे स्वप्न पूर्ण करण्याचे काम करीत असल्याची टीका आशिष शेलार यांनी या वेळी केली. जे स्वप्न औरंगजेब बघून खस्ता झाला, मृत्युमुखी पडला. ते महाराष्ट्रावर आणि मराठी माणसावर कब्जा करण्याचे औरंगजेबी स्वप्न उद्धवजी तुमच्या या बेगमीतून तुम्ही मराठी माणसावर का लादताय? औरंगजेबाचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी तुम्ही स्वीकारली आहे का? हा आमचा तुम्हाला सवाल आहे, असे आशिष शेलार या वेळी म्हणाले.

## नाशिकमध्ये हिट ॲण्ड रन; मद्यधुंद चालकासह १२ जण जखमी

**नाशिक : प्रतिनिधी**

अमरधाम रोड शितळादेवी परिसरात शनिवारी रात्री १च्या सुमारास हिट ॲण्ड रनची घटना घडली. नानावलीच्या दिशेने जाणाऱ्या मद्यधुंद कारचालकाने अंत्यविधीसाठी आलेल्या लोकांना चारचाकीने धडक दिली. यात चालक व त्याच्या सहकाऱ्यासह एकूण १२ जण जखमी झाले आहेत. जखमींवर जिल्हा शासकीय रुग्णालय तसेच खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



सिडको येथील सिटी लिंक बसचालक मकरंद पंचाक्षरी (वय २३) यांच्या अंत्यविधीसाठी अन्य कर्मचारी नाशिक येथील अमरधाम येथे आले होते. अंत्यविधी झाल्यावर यातील काही कर्मचारी अमरधामबाहेरील रस्त्यावर उभे होते. त्या वेळी आडगाव नाका दिशेकडून नानावलीकडे जाणाऱ्या चारचाकीने (एमएच ०५, एएक्स ३९५७) रस्त्यावर उभे असलेल्या कर्मचाऱ्यांना समोरून जोरदार धडक दिली.

यात अपघातग्रस्त चारचाकीचालक त्याचा सहकारी आणि सिटी लिंकचे कर्मचारी असे १२ जण जखमी झाले आहेत. चारचाकीचालक मद्यधुंद अवस्थेत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. अपघाताची माहिती पोलीस घटनास्थळी दाखल झाले. एका खासगी वाहनातून जखमींना जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर उपचार सुरू असून त्यापैकी तीन जणांची परिस्थिती गंभीर आहे.

## ड्रग्जप्रकरणी भारती-हर्षच्या विरोधात एनसीबीकडून आरोपपत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

कॉमेडी क्वीन भारती सिंग आणि तिचा पती हर्ष लिंबाचिया यांच्याविरोधात अमली पदार्थविरोधी दलाकडून (एनसीबी) २०० पानांचे आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. दोन वर्ष जुन्या ड्रग्ज केस प्रकरणात हे आरोपपत्र एनसीबीने दाखल केले आहे. त्यामुळे भारती आणि हर्षच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहेत.



२०२० साली ड्रग्ज केस प्रकरणात भारती सिंग आणि हर्ष लिंबाचियाला अटक करण्यात आली होती. त्यानंतर त्यांची जामिनावर सुटकही झाली, मात्र आता एनसीबीने आरोपपत्र दाखल केले आहे. २१ नोव्हेंबर २०२० रोजी एनसीबीने भारती आणि हर्ष यांच्या अंधेरीतील प्रोडक्शन ऑफिसमध्ये छापेमारी केली होती. या छापेमारीत ८६.५ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. हर्ष आणि भारतीने ड्रग्जचे सेवन केल्याची कबुली तपासात दिली होती. या प्रकरणात अटक झाल्यानंतर भारती आणि हर्षची १५ हजार रुपये जामिनावर सुटका करण्यात आली होती.

एनसीबीने अमली पदार्थांविरोधात कारवाई तीव्र केली असून या संदर्भात कसून तपास सुरू केलेला आहे.

## 'कंतारा'ला दणका! वराह रूपम गाणे वापरण्यास कोर्टाची मनाई

**कोझिकोड : वृत्तसंस्था**

कंतारा चित्रपटाची सर्वांनाच भुरळ पडली आहे. या चित्रपटाने अनेक विक्रमी रेकॉर्ड केले आहेत, मात्र आता हा चित्रपट वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. कोझिकोड जिल्हा सत्रअ न्यायालयाने 'कंतारा'मधील वराह रूपम हे गाणे वापरण्यास अंतरिम मनाई आदेश ठोठावला आहे.




कर्नाटकच्या एका ग्रामीण भागामध्ये भूतकोला नावाची एक प्रथा आहे. कांतारा चित्रपटात ती दाखवण्यात आली आहे. त्यावरून वाद सुरु झाला आहे. याआधी 'कातांरा'तील वराह रूपम गाण्याच्या ओळी चोरल्याचा आरोप थैक्कुडम ब्रिज या लोकप्रिय बँडने केला होता आणि कॉपीराइटचे उल्लंघन केल्याचा आरोप करीत याचिका दाखल केली होती.

या पार्श्वभूमीवर कोझिकोड जिल्हा सत्र न्यायालयाने 'कंतारा'मधील वराह रूपम हे गाणे वापरण्यास अंतरिम मनाई आदेश ठोठावला आहे. ओटीटी प्लॅटफॉर्म, संगीत चॅनेल, वेबसाइट आणि यूट्यूब याशिवाय निर्माता, दिग्दर्शक आणि संगीत दिग्दर्शकासह चित्रपटाच्या निर्मात्यांना थैक्कुडम ब्रिज बँडच्या परवानगीशिवाय गाणे वापरण्यास या आदेशांतर्गत बंदी घालण्यात आली आहे.

## शॉर्टसर्किट, सिलिंडरचा स्फोट; भीषण आगीत ३० जण होरपळले

**पटणा** : बिहारमधील औरंगाबाद जिल्ह्यात शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या शॉर्टसर्किटनंतर गॅस सिलिंडरचाही स्फोट झाल्यामुळे ही आग जास्तच पसरली. या आगीत जवळपास ३० जण होरपळले असून यातील १० जण गंभीर जखमी झाल्याच्या म्हटले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार बिहारच्या औरंगाबादमध्ये सुरुवातील शॉर्टसर्किट आणि नंतर सिलिंडरचा स्फोट झाल्यामुळे भीषण आग लागल्याची घटना घडली. छट्पूजेसाठी येथे एका घरात स्वयंपाक करण्यात येत होता, मात्र या वेळी अचानकपणे शॉर्टसर्किट झाल्यामुळे भीषण आग लागली. त्यानंतर या आगीत गॅस सिलिंडरचाही स्फोट झाला. परिणामी आगीने उग्र रुप धारण केले. या घटनेत सुमारे ३० जण होरपळल्याचे म्हटले जात आहे. यातील १० जणांची प्रकृती गंभीर आहे.

## ठाण्यात बाळासाहेबांच्या शिवसेनेचा कोकण महोत्सव

**ठाणे : प्रतिनिधी**

बाळासाहेबांची शिवसेना आयोजित १५व्या कोकण महोत्सवाचे आयोजन २९ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर या कालावधीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपस्थितीत ठाणे सावरकर नगर येथील महापालिका पटांगणात करण्यात आले आहे. महोत्सवाचे आयोजक माजी नगरसेवक दिलीप बारटक्के यांनी ही माहिती दिली.

या महोत्सवात कोकणातील प्रसिद्ध दशावतार नाट्यमंडळाची पारंपरिक दशावतारी नाटके, धयकाले, नमन, व्याख्यान, महिलांसाठी खेळ पैठण्यांचा, गुणवंत विद्यार्थ्यांचा व नागरिकांचा सत्कार, मुलांसाठी फनफेअर, स्थानिक नवोदित कलाकाराचा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. विशेष आकर्षण वेंगुर्लेमधील आरवली गावचे ग्रामदैवत श्रीदेव वेतोबा मंदिराची प्रतिकृती या ठिकाणी साकारण्यात आली आहे. या महोत्सवात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते माजी नगरसेवक दिलीप बारटक्के यांचा पंचवार्षिक कार्य अहवाल प्रकाशन सोहळा होणार आहे.

कोकणातील कुटुंब प्रमुख, परिवार गावी शेती-व्यवसाय करतो. त्याचे येथील चाकरमानी यांच्यातर्फे कौतुक व्हावे, त्याच्या वस्तूंना बाजारपेठ मिळावी या उद्देशाने कोकण भूमीतील आंबा, फणस पोळी, काजू घरगुती उकडे तांदूळ, कुळदाची पिठी, आमसुल, तिरफळा, मालवणी मसाले, मासळी, खाद्यपदार्थ म्हावरा, खडखडे लाडू, मालवणी खाजा आदी स्टॉल महोत्सवात उभारले आहेत, अशी माहिती कोकण महोत्सव समिती संकल्पनाकार अमित लोटलीकर, शाखाप्रमुख हितेंद्र लोटलीकर व सुहास चव्हाण यांनी दिली.

कोकण महोत्सवाचा शुभारंभ कोकण मराठी साहित्य परिषद केंद्रीय कार्याध्यक्ष प्रसिद्ध साहित्यिक प्रा. प्रदीप ढवळ यांच्या हस्ते होणार आहे. या महोत्सवादरम्यान दररोज सायंकाळी ६ ते रात्री १० वाजता विविध सांस्कृतिक कार्यक्रम होतील. मोहत्सवाक येवकच होया, कोकण आपलोच आसा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## किक बॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशनतर्फे कार्यशाळा

### इराणचे प्रशिक्षक महादी फारूक यांच्याकडून मार्गदर्शन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील किक बॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशनची २७ ते ३१ ऑक्टोबर रोजी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. मानघर येथील अक्षरधाम फार्महाऊस येथे आयोजित या कार्यशाळेस इराणचे मुख्य प्रशिक्षक डॉ. महादी फारूक यांनी भेट देत मार्गदर्शन केले.



कार्यशाळेत डॉ. फारूक यांनी त्यांच्याशी हितगुज साधून किक बॉक्सिंगचे प्रात्यक्षिक करून मार्गदर्शन केले.

या वेळी हेडकोच जीवन धाकवल, सुधाकर घारे, मधुकर घारे, भगवान शिंदे, महेश मिसाळ, सिहान राजू कोळी, सेन्सई डॉ. कृष्णा पाटील, आनंद खारकर, महेंद्र कोळी, राकेश म्हात्रे, राजेश कोळी, परेश पावसकर, गोपाळ म्हात्रे, अनिश पाटील, भूषण म्हात्रे, अमिता घरत, अमिषा घरत, शुभम ठाकूर, रोहित घरत, मानसी ठाकूर, सुजित पाटील, सुलभा कोळी, कक्षा म्हात्रे, दिलीप घरत यांचे सहकार्य लाभले.

## महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगास स्थूलता एक प्रमुख कारण -डॉ. भोळे

**मुंबई : प्रतिनिधी**

स्व:तपासणीचा अभाव, सांस्कृतिक तफावत व महिलांच्या आरोग्याविषयी असलेली अनास्था यामुळे भारतामध्ये स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. यातच स्थूलता हे शहरी भागातील महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोग होण्यासाठी प्रमुख कारण समोर येत आहे. यावर मुलुंड येथील प्लॅटिनम हॉस्पिटलचे कर्करोग तज्ज्ञ व शल्यचिकित्सक डॉ. मकरंद भोळे यांनी प्रकाश टाकला आहे.



जगात स्तनाचा कर्करोग हा सर्वांत जास्त प्रमाणात स्त्रियांमध्ये आढळून येतो. कर्करोगात प्रकारांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण हे २५ टक्के असूनही याबाबत आजही या रोगाबाबतच्या जनजागृतीचा अभाव आहे. आर्थिक सुबत्तेमुळे प्रमाणापेक्षा जास्त खाणे, जास्त उष्मांक (कॅलरीज) असलेले फास्ट फूड, खाण्याच्या व झोपण्याच्या अनियमित सवयी, महिलांमध्ये वाढलेले अल्कोहोल घेण्याचे प्रमाण आणि ताणतणाव यातून शहरी महिलांमधील स्थूलता वाढत आहे. या स्थूलतेमुळे ऐन तारुण्यात मधुमेह आणि उच्च रक्तदाब या व्याधी जडतात. त्याला वैद्यकीय परिभाषेत 'मेटॅबोलीक सिंड्रोम' असेही म्हणतात व ही स्थूलता ही स्तनाच्या कर्करोगाचे उगमस्थान होत आहे तसेच करिअरमुळे मूल उशिरा जन्माला घालणे, मुलाला अंगावर न पाजणे, वजन कमी करण्यासाठी पाश्चिमात्य डाएट करणे हीदेखील या रोगाला निमंत्रण देण्याची प्रमुख कारणे समोर आली आहेत. ऑक्टोबर महिना हा ब्रेस्ट कॅन्सर जागरूकता महिना साजरा केला जातो. या निमित्ताने मुलुंड येथील प्लॅटिनम हॉस्पिटलमध्ये संपूर्ण महिनाभर विविध चर्चासत्र तसेच मोफत स्तनाचा कर्करोग तपासणी शिबिरे आयोजित करण्यात आली होती.

### संतुलित जीवनशैली आवश्यक

**रजोनिवृत्तीनंतर स्त्रीबीजांडकोषातून तयार होणाऱ्या इस्ट्रोजेनचे प्रमाण कमी होते, पण रजोनिवृत्तीनंतर जाडेपणा व ढेरपोटेपणा वाढला, तर ही पोटातील चरबी इस्ट्रोजेन निर्माण करू लागते व स्तनाच्या कर्करोगाचा धोका वाढतो. कर्करोग बऱ्याच प्रमाणात जीवनशैलीशी निगडित असतो. बालपणापासून उत्तम व संतुलित जीवनशैली असेल तर कर्करोगाचे प्रमाण कमी होते 'जितका पोटाचा घेर मोठा तितकी आयुष्यरेखा तोकडी' ही म्हण आजच्या शहरी नागरिकांना लागू आहे, असेही डॉ. भोळे यांनी नमूद केले.**

याविषयी अधिक माहिती देताना प्लॅटिनम हॉस्पिटलचे कर्करोग तज्ज्ञ व शल्यचिकित्सक डॉ. मकरंद भोळे यांनी सांगितले की, शहरामध्ये १०पैकी एका महिलेला संभाव्य स्तनाच्या कर्करोगाची भीती असूनही महिलांमध्ये याविषयी अजूनही जागरूकता आलेली नाही. कर्करोग होण्यासाठी कारणीभूत जोखमीच्या घटकांमध्ये जीवनशैलीचाही समावेश असतो. त्यापैकीच एक म्हणजे लठ्ठपणा. लठ्ठपणा म्हणजे शरीरातील चरबीचे प्रमाण अतिरिक्त असणे. लठ्ठपणाचे प्रमाण लहान मुले, महिला आणि पुरुष अशा सर्व वयोगटांमध्ये दिसत आहे. चुकीची जीवनशैली, व्यायामाचा अभाव, बैठे काम, खाण्याच्या चुकीच्या वेळा, अनुवंशिकता, हार्मोनल, भावनिक, वातावरणीय घटक या गोष्टी लठ्ठपणाला कारणीभूत ठरत आहेत. वजन वाढल्यामुळे शरीरातील अतिरिक्त चरबी वाढते व या चरबीमुळे पोटातील आतल्या भागाला सूज येते, म्हणजे 'इन्फ्लेमेशन' होते. या इन्फ्लेमेशनमुळे जी रसायने शरीरात तयार होतात ती पेशींच्या डीएनएला व पेशींच्या चयापचयाला म्हणजे 'मेटॅबॉलिझम'ला हानिकारक असतात. जाडेपणा हळूहळू वर्षानुवर्षे वाढत असतो. त्यामुळे ही रसायने शरीरात भिनतात व कर्करोगाचा धोका वाढतो.

# नवीन पनवेलमध्ये इमारतीचा स्लॅब कोसळला

## माजी नगरसेवक मनोज भुजबळ यांच्याकडून पुनर्वसनाचे आश्वासन

### सुदैवाने जिवीत हानी टळली





**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल सेक्टर १२ येथील साई पार्क को ऑप हौसिंग इमारतीचा चौथ्या मजल्याच्या स्लॅब खालील मजल्यावरील फ्लॅट मध्ये कोसळला. सुदैवाने या दुर्घटनेमध्ये कोणतीही जीवित हानी नाही झाली.

या घटनेची माहिती मिळताच माजी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ यांनी त्वरित या घटना स्थळाला जाऊन राहिवाश्यांची भेट घेतली. आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले, तर काही रहिवाश्यांना राहण्यासाठी फ्लॅट ही उपलब्ध करून दिले. त्याबद्दल इमारतीमधील रहिवाश्यांनी त्यांचे आभार मानले.

साई पार्क इमरातीचे बांधकाम १९९६ साली प्यारेडाइस ग्रुप यांनी केले होते. साई पार्क इमारतीचे सेक्रेटरी रमेश म्हात्रे यांनी इमारतीचा स्लॅब कोसळला समयी तत्परतेने तिसऱ्या माळ्यावर उडी मारून एका ७५ वर्षीय वर्षीय वृद्धांचे प्राण वाचवले. याबद्दल अ‍ॅड. मनोज भुजबळ यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले.

या वेळी सोशल मीडिया सेल शहर संयोजक प्रसाद हनुमंते, मंगेश चंदने, पनवेल महापालिका अधिकारी रमेश गरुडे, सौरभ ठोकळ, तसेच सोसायटीचे अध्यक्ष पंकज पाटील, सेक्रेटरी रमेश म्हात्रे, सदस्य सुयोग साखरे, पंकज शर्मा उपस्थित होते.

# भाजीपाल्याचे दर वाढले; पावसाचा परिणाम

**नवी मुंबई, पनवेल : रामप्रहर वृत्त**

पावसाच्या बिघडलेल्या वेळापत्रकामुळे यंदा कृषीमालाचे मोठे नुकसान झाले आहे. त्याचा सर्वाधिक फटका दररोज लागणाऱ्या भाजीपाल्याला बसला असून गेल्या सहा महिन्यांपासून भाजीपाल्याचे दर चढेच आहेत. दिवाळीआधी बहुतांश भाज्यांचे दर १०० रुपये किलोपर्यंत पोहचले होते, मात्र दिवाळीनंतर तर किमतींनी उच्चांक गाठला असून घाऊक बाजारातच भाज्या १०० ते १२० रु. किलो झाल्या आहेत. परिणामी किरकोळ बाजारात भाज्यांचे दर किलोमागे १२० ते २०० रुपयांपर्यंत पोहचले आहेत. आतापर्यंत बाजाराच्या इतिहासात हे सर्वाधिक दर आहेत.

दिवाळीपर्यंत अधूनमधून पडणाऱ्या पावसाने यावेळी बरीच पिके पाण्यात गेली. त्यामुळे सहा महिन्यांपासून भाजीपाल्याचे दर चढेच आहेत. दिवाळी तरी दर कमी होण्याची अपेक्षा होती. मात्र अगदी दिवाळी तोंडावर आली, तरी पावसाने दाणादाण उडवल्याने हातातोंडाशी आलेल्या भाजीपाल्यावर पाणी पडले आहे. त्यामुळे बाजारात भाजीपाल्याची आवक घटली आहे. दररोजची ६०० ते ६५० गाड्यांची आवक केवळ ४०० गाड्यांवर आली आहे. त्यातही केवळ २० टक्के माल उत्तम दर्जाचा असून, उर्वरित ८० टक्के भाजीपाला भिजलेला, करपलेला आहे. त्यामुळे जो काही चांगला भाजीपाला बाजारात येत आहे, त्याला मोठी मागणी आहे. परिणामी त्यांच्या दरातही वाढ झालेली दिसत आहे.

घाऊक बाजारातच अनेक भाज्या ८० ते १००, अगदी १२० रुपये किलो झाली आहे. त्यामुळे किरकोळ बाजारात भाज्यांचे दर १५० ते २०० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. किरकोळ बाजारात मटार आणि शेवगा २०० रुपये किलो झाला आहे. आतापर्यंत त्यांचे दर १०० ते १२० रुपये किलो होते, मात्र या वेळी त्यांनी उच्चांक गाठला आहे.

दिवाळीच्या काळात शेतात कामासाठी मजूर मिळत नसल्यामुळे भाजीपाला शेतातून काढून त्याचे पॅकिंग करून तो बाजारात पाठवायलाही मजूर उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे बाजारात भाजीपाला येणे कठीण होते. त्यात आता तर शेतात भाजीपालाही कमी आहे. त्यामुळे बाजारात भाज्याच उपलब्ध होत नसल्याची परिस्थिती आहे.

**शेतमालाचे पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे बाजारात येणाऱ्या मालाची आवक कमी झाली आहे. त्यातच बाजारात २० टक्के मालच उत्तम दर्जाचा येत आहे. त्यामुळे त्या उत्तम दर्जाच्या मालाचे भाव चढेच आहेत. ही परिस्थिती बदलण्यासाठी आणखी किमान १५ दिवस लागतील. त्यानंतरच दर खाली यायला सुरुवात होईल.**

**-शंकर पिंगळे, भाजीपाला बाजार संचालक**







**खारघर : छट्‌पूजा ही उत्तर भारतातील स्त्रिया करीत असलेली एक प्रकारची सूर्यपूजा आहे. छटव्रत स्वीकारून ही पूजा करण्यात येते. त्या अंतर्गत भाजपचे उत्तर भारतीय प्रकोष्ठ अध्यक्ष विनोद ठाकूर यांनी रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक ठिकाणी छट्‌पूजेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाची तयारी सुरू असून या कामाची पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक प्रवीण पाटील तसेच विनोद ठाकूर, शैलेंद्र त्रिपाठी, उमेश पाटील, विश्वास पाटील यांनी पाहणी केली.** (छाया : चेतन पोपेटा)


## नवी मुंबईत हत्या करणाऱ्यास अटक

**नवी मुंबई :** ताडी पित असताना मोठ्या आवाजात बोलत असल्याने झालेल्या वादात एकाने दुसऱ्याची हत्या केल्याचा प्रकार नवी मुंबईतील दिघा परिसरात घडला होता. या घटनेनंतर आरोपीने पळ काढला होता. गुन्हे शाखेने समांतर तपास करीत आरोपीला अटक केली आहे. सोनु पांडे असे अटक व्यक्तीचे नाव आहे, तर राज उतेकर असे हत्या झालेल्या व्यक्तीने नाव आहे.

राज व त्याचे मित्र कल्पेश पाटील व अन्य एक जण दिघा ईश्वर नगर येथील ताडी माडी केंद्रात ताडी पित बसले होते. काही वेळाने परिसरात राहणारा सोनू पांडे हा केंद्रात आला व काउंटर शेजारीच ताडी पित उभा राहिला. राज याला हळू आवाजात बोल एवढ्या मोठ्यांदा का बोलतो असे म्हणाला या वरून दोघांचे वाद झाले त्यात सोनू याने राज याला मारहाण केली. रुग्णालयात दाखल केले मात्र तेथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# पनवेलमध्ये १० ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसाठी तयारी सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



राज्यातील नोहेंबर ते डिसेंबर २०२२ या दरम्यान मुदत संपणाऱ्या सुमारे सात हजार ६४९ ग्रामपंचायती आणि नव्याने स्थापित झालेल्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामध्ये पनवेल तालुक्यातील ११ ग्रामपंचायतींची निवडणूकही या टप्प्यात घेण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने गावोगावच्या मतदार याद्या तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

या मतदार याद्यांमध्ये ३१ मे २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली विधानसभेची मतदारयादी गृहीत धरण्यात येणार असून १३ ऑक्टोबर रोजी प्रत्येक गावातील प्रभागनिहाय याद्या जाहीर करण्यात येणार आहेत. त्यावर हरकती घेण्यासाठी १३ ते १८ ऑक्टोबर २०२२ हा कालावधी देण्यात आला आहे. या शिवाय प्रभागनिहाय याद्या २१ ऑक्टोबर २०२२ रोजी प्रसिद्ध झाली आहेत. पनवेल तालुक्यातील केळवणे, दिघाटी, शिरढोण, चिंध्रण, वाघिवली, शिवकर, कानपोली, करजांडे, भाताण, नितळस, नेरे या ग्रामपंचायतींची निवडणूक साधारणतः नोव्हेंबर ते डिसेंबर २०२२ अखेरपर्यंत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# सणासुदीत वाचनाकडे कल; दिवाळी अंकांना मागणी वाढली




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळी हा आनंदाचा, संस्कृती समृद्ध करण्याचा सण आहे. महाराष्ट्रात किल्ले बांधणी, रांगोळी, दिवाळी अंक, फराळ अशा अनेक परंपरांचा समावेश होतो आणि या साऱ्या परंपरा नित्यनेमानी जपल्याही जातात. एका अर्थाने संस्कृती समृद्ध करण्याच्या या परंपरा दिवाळीची विशेषत: आहेत.

अलीकडच्या काळात वाचनसंस्कृती कमी होत असल्याचे सर्वत्र व्यक्त होत असतानाच दिवाळीच्या काळात ज्येष्ठांबरोबर तरुणाई व बच्चे कंपनी वाचनाकडे वळताना दिसत आहेत. कोरोनानंतरच्या काळात दोन वर्षांमध्ये उत्साहाने साजरा होणाऱ्या या सणात ग्रंथालय, पुस्तक विक्रेते यांच्याकडे विविध पुस्तके, दिवाळी अंकांची मागणी होत आहे. यातूनच सणाच्या निमित्ताने वाचनाकडे कल वाढल्याचे दिसत आहे.

दिवाळी आणि दिवाळी अंकांची खास अशी सांस्कृतिक परंपरा महाराष्ट्रात आहे. या परंपरेनुसार महाराष्ट्रात अनेक दिवाळी अंक प्रकाशित होतात. खाद्यपदार्थ, गडकिल्ले, कथा, कविता इत्यादी विषयांवरचे अंक वाचकांसाठी मेजवानी ठरतात. कोरोना काळात दिवाळी अंक प्रकाशनात अडचणी आल्या होत्या. यावर्षी मात्र ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणात दिवाळी अंकांचे प्रकाशन झाले आहे. वाचक आवर्जून दिवाळी अंकांची विचारणा करत असून, पसंतीचे अंक विकत घेत आहेत. या काळात ऐतिहासिक, धार्मिक व साहित्य प्रेरणा देणाऱ्या पुस्तकांना मागणी असल्याचे विक्रेते, ग्रंथालयप्रमुख व वाचकांनी सांगितले.

**पनवेलचे सांस्कृतिक वैभव असलेल्या लिमये वाचनालयात गेल्या ७० वर्षांपासून दिवाळी अंक मागविले जातात. यावर्षी भरघोस अंक आलेले आहेत. दिवाळीमध्ये दिवाळी अंकांबरोबरच इतर वाचनीय पुस्तकांना मागणी असते. वाचनालयातील विविध पुस्तके वाचक घेऊन जात आहेत. दिवाळी अंकांसाठी वाचक वाढले असून, ५० टक्के अधिक वाचकांची संख्या वाढली आहे.**

**-निकेता शिंदे, ग्रंथपाल, के. गो. लिमये वाचनालय, पनवेल**

**दिवाळीनिमित्ताने विविध विषयांवरील लेखन वाचण्यास मिळतात. दिवाळीत सुट्या असल्यामुळे हा कालावधी व्यक्तिमत्व विकासात घालवण्यासाठी वाचन करत आहे. वाचनाची आवड असल्याने विविध प्रकारचे वाचन करत आहे.**

**-राम देशपांडे, वाचक**

# लायन्स क्लबतर्फे गरीब, गरजू मुलांसाठी उपक्रम

**उरण : वार्ताहर**

लायन्स क्लब द्रोणागिरी वतीने स्तुत्य कार्यक्रम नेहमीच राबविले जातात त्यात उरण चारफाटा येतील नाईक नगर मध्ये गेल्या सहा महिन्यापासून गरीब व गरजू मुलांना दर शनिवार व रविवार या दिवशी जेवण व शिक्षणाचा उपक्रम राबविण्यात आला.

शनिवारी व रविवारी कमीत कमी ७५ मुलांना शिक्षण देण्यात येत आहे, तसेच शनिवारी शंभर ते दीडशे मुलांना जेवण वाटप करण्यात येते. त्यासोबतही इतरही कार्यक्रमही राबविण्यात येतात. गरीब व गरजू मुलांना शालेय शिक्षणाचे साहित्य वाटप केले जाते. तसेच नाईक नगरमध्ये एक बोरवेल हा प्रोजेक्ट ही राबवलेला आहे आणि त्यामुळे तिथूनच्या काही घरांना पाण्याची सोय झालेली आहे.

लायन्स क्लब द्रोणागिरी हा ०७ मे २०२२ रोजी अस्तित्वात आला. उरण मधील काही प्रतिष्ठित लोकही मदत करतात अजूनही काही लोकांना जर या गरीब मुलांसाठी काही मदत करावी ची असेल भूमिका सिंग (९८६७५७७६६८), मोनिका चौकर (९२२६२०८६२५) सीमा घरत (९८६७४५२८८८), सागर चौकर (८३५६००१९३७) यांच्याशी संपर्क साधवा, असे आवाहन लायन्स क्लब द्रोणागिरीतर्फे करण्यात आले आहे.



# घरोघरी तुळशी विवाहाची परंपरा



रंगरंगोटी करून हार-फुलांनी सजवलेले तुळशी वृंदावन, त्या समोर पाटावर ठेवलेली बालकृष्णाची मूर्ती. तुळशी आणि पाटाच्यामध्ये धरलेला अंतरपाट आणि शुभमंगल सावधान म्हणताच पडणारा अक्षतांचा पाऊस, ५ नोव्हेंबरपासून घरोघरी तुळशी विवाहाचा हा सोहळा पाहावयास मिळणार आहे. रायगड जिल्ह्यात ग्रामीण तसेच शहरी भागातही तुळशी विवाहाची परंपरा अजूनही भक्तिभावाने जोपासली जाते.

दिवाळी संपली की, सर्वांना वेध लागतात ते तुळशी विवाहाचे. कार्तिक शुक्ल पक्ष एकादशीपासून तुळशी विवाहास सुरुवात होते. प्रथम पंढरपुरात तुळशीचे लग्न लागल्यावर महाराष्ट्रात सर्वत्र तुळशी विवाहास सुरुवात होते.

दारात चुन्याची रांगोळी काढली जाते. तुळशी रोपाशी नवीन माती घालून वृंदावनाची रंगरंगोटी केली जाते. दारात झेंडूच्या, आंब्याच्या पानांचे तोरण, पताका लावल्या जातात. घरातीलच कन्या मानून तुळशीला सजवतात. मंजिरी असलेली तुळस लग्नासाठी योग्य असते, असे मानले जाते. सजवलेल्या उसांचा व केळ्यांच्या पानांचा सुरेख मंडप केला जातो. तुळशी विवाहासाठी पाटावर आसन टाकून तुळस आणि शालिग्राम मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाते. प्रथम कलश आणि गौरी गणेशाची पूजा केली जाते. काही ठिकाणी विड्याचे तसेच वर म्हणून फेट्याचेही पूजन करतात. तुळशीला नवीन वस्त्र पांघरतात. बालकृष्ण व तुळस या दोघांमध्ये अंतरपाट धरून मंगलाष्टके म्हणत विवाह लावला जातो. विष्णू आणि तुळशीची आरती करून पूजेनंतर प्रसादाचे वाटप केले जाते. दिवाळी फराळ, लाह्या-बत्ताशे, खजूर, ऊसाचे तुकडे वाटले जातात. विवाह संपन्न झाल्यावर फटाक्यांची आतषबाजी केली जाते. या पूजेत मुळा, रताळे, आवळा, मनुका, पेरू विविध फळे यांचा समावेश असतो. तुळशी विवाह संपन्न झाल्यावर विवाहेच्छुकांची लगीन घाई सुरू होते. पंचांगानुसार या वर्षी ५ नोव्हेंबरपासून तुळशी विवाहाला प्रारंभ होत असून ८ नोव्हेंबरपर्यंत म्हणजेच कार्तिक पौर्णिमेपर्यंत हे तुळशी विवाह साजरे केले जातील.

जालंधर राक्षसाने कठोर तप करून वर मिळवला आणि तो उन्मत्त झाला. त्याची पत्नी वृंदाची पुण्याई त्याच्या पाठीशी होती. यामुळे त्याचा वध करणे कोणास शक्य नव्हते. जालंधराचा वध करण्यासाठी त्याची पत्नी वृंदा हिच्या पतिव्रताचा भंग करणे आवश्यक होते. म्हणून विष्णूने जालंधराचे रूप धारण करून आपले कार्य केले. हे जेव्हा वृंदेला समजले, तेव्हा तिने देहत्याग केला आणि विष्णूंना दगड होण्याचा शाप दिला. विष्णूनेही तिला तुळशीचे रोप होण्याचा प्रतिशाप दिला; परंतु वृंदेच्या पतिव्रतामुळे संतुष्ट होऊन विष्णूने तिला वरही दिला, की तुळशीची पूजा केली जाईल आणि या घटनेची स्मृती म्हणून शालिग्रामाशी, म्हणजेच विष्णूशी, तुळशीचे लग्न लावले जाते, अशी कथा सांगितली जाते.

**-सुनील पाटकर, महाड**

**आर्य समाजाचे संस्थापक आणि थोर समाजसुधारक स्वामी दयानंद सरस्वती यांचा ३० ऑक्टोबर हा स्मृतिदिन. त्या निमित्ताने, त्यांच्याबद्दलचा हा लेख.स्वामी दयानंद सरस्वती यांचा जन्म २० सप्टेंबर १८२४ या दिवशी सौराष्ट्रात असणाऱ्या मोरवी संस्थानातील टंकारा या गावी झाला. दयानंदांचे पाळण्यातले नाव मूलशंकर असे होते. वयाच्या पाचव्या वर्षी दयानंदांनी विद्यार्जनारंभ केला. आठव्या वर्षी त्यांची मुंज झाली. बालपण संपण्यापूर्वीच या कुशाग्र बुद्धीच्या मुलाने वेदांचा अभ्यास आरंभ केला. व्याकरण, तर्कशास्त्र आणि साहित्य शास्त्र यांचाही परिचय करून घेतला. व्यासंगामुळे बुद्धीला प्राप्त होणारी प्रगल्भता त्यांच्या वाट्याला तुलनेने लवकर आली. ते अकाली प्रौढ झाले. प्रौढपणी तर ते सर्वज्ञ होतील, अशी चिन्हे दिसू लागली.**



# आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती

दयानंदांनी केवळ पुस्तकी विद्या घेतली नाही, तर समाजाच्या बांधणीसाठी व राष्ट्राच्या उभारणीसाठी लोकांपुढे एक विधायक कार्यक्रम ठेवला. भारतीयांनी स्वदेशी वस्तू वापराव्यात; स्वदेशी शासनाचा अट्टाहास बाळगावा; स्वधर्माचे रक्षण करावे; शासनव्यवस्थेत विद्वान, चारित्र्यवान आणि आर्थिक पावित्र्याचे तत्त्वपालन करणारी माणसे असावीत; समाज सर्व प्रकारच्या अंधश्रद्धांपासून मुक्त व्हावा; कोणी मूर्तिपूजा करू नये; वडा-पिंपळाला भजू नये; भूत, प्रेत, नाग, पीर यांना पूजाविषय करू नये; स्त्रियांनी वेदाध्ययन करावे; प्रसंगी युद्धशास्त्रही शिकावे; शिक्षणाशिवाय समाजाचा उत्कर्ष होणार नाही; पण शिक्षण हे भाडोत्री विद्यालयात देऊ नये. ते आचार्य कुलात किंवा गुरुकुलात द्यावे; निसर्गरम्य आणि निर्मळ वातावरणात मुला-मुलींवर व्रतस्थ जीवनाचा संस्कार करावा; विवाहयोग्य होण्यासाठी मुला-मुलींच्या बाबतीत वयाचे बंधन असावे. मुलीचे वय किमान १७ वर्षे व मुलाचे वय २५ वर्षे असावे, असे विचार त्यांनी मांडले. दयानंद यांनी सामाजिक दुष्कृत्ये, अंधश्रद्धा, रूढीवादी व वाईट गोष्टींचा प्रतिकार केला. या सर्वांना त्यांनी विरोध केला म्हणूनच त्यांना संतयुद्ध म्हटले गेले. दयानंद हे दलितांचे समर्थक होते. त्यांनी महिलांच्या शिक्षणासाठी जोरदार चळवळ सुरू केली. बालविवाह आणि सती जाण्यास मनाई केली. विधवाविवाहास पाठिंबा दर्शवला. महर्षी दयानंद सर्व धर्मगुरूंना एकाच व्यासपीठावर आणून एकता स्थापित करण्याचा प्रयत्न करीत होते.

महर्षी दयानंद हे केवळ समाजसुधारक आणि धार्मिक पुनर्जागरणाचे प्रणेते नव्हते, तर ते एक महान राष्ट्रवादी आणि राजकीय आदर्शवादी होते. स्वामी दयानंद यांचा आर्य समाजाचे संस्थापक आणि समाज सुधारक म्हणून उल्लेख केला जातो. १८८५ला हरिद्वारमध्ये कुंभमेळा होता. त्यात सामील होण्यासाठी स्वामीजींनी अबू पर्वत येथून हरिद्वारपर्यंत पायी प्रवास केला. वाटेत त्यांनी ठिकठिकाणी उपदेशपर भाषणे केली आणि देशवासीयांची नाडी शोधून काढली. त्यांच्या हे लक्षात आले, की आता ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीला लोक कंटाळले आहेत आणि देशाच्या राजकारणासाठी, स्वातंत्र्यासाठी लढा देण्यास उत्सुक आहेत.

पुणे हे संस्कृत विद्येचे माहेरघर! विद्वानांच्या या नगरात स्वामीजींनी ५० व्याख्याने दिली. २० जून १८७५ रोजी स्वामीजी पुण्यात आले. त्यानंतर सुमारे तीन महिने ते प्रसंगपरत्वे बोलत राहिले. बुधवार पेठेतील तांबड्या जोगेश्वतरीजवळच्या भिडे वाड्यात स्वामींनी सलग पंधरा व्याख्याने दिली. ५ सप्टेंबर १८७५ या दिवशी स्वामीजींच्या सन्मानार्थ भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत न्यायमूर्ती रानडे, महात्मा फुले अग्रभागी होते. या शोभायात्रेत व्यत्यय आणण्याचा प्रयत्न काही कर्मठांकडून घडेल, अशी भीती सर्वांना वाटत होती म्हणून न्यायमूर्ती रानडे महात्मा फुले यांना आदल्या दिवशी भेटले व त्यांना मिरवणुकीत सहभागी होण्याची विनंती केली. महात्मा जोतिबा फुले यांच्या तालमीत तयार झालेली तगडी आणि धट्टीकट्टी मुले पाहून सनातनी घाबरले. कोणीही नंतर पुढे आले नाही.

महाराष्ट्राप्रमाणे पंजाब आणि राजपुताना या प्रांतातही स्वामींनी शास्त्रार्थाच्या सभा घेतल्या व ज्ञानयज्ञ केले. अनेक रजपूत राजे त्यांचे भक्त झाले. त्यांचा कायापालट झाला. हळूहळू ते लक्ष्मीपुत्र आसक्तीकडून विरक्तीकडे व विरक्तीकडून देशभक्तीकडे वळले. हे सामाजिक स्थित्यंतर अनेकांना खपले नाही. जोधपूरचे नरेश जयवंतसिंह हे एक मदिरासक्त व स्वैराचारी राजे होते. त्यांच्या गैरवर्तनाला आवर घालावा म्हणून त्यांचे दोघे बंधू प्रतापसिंह आणि तेजसिंह यांनी स्वामीजींना प्रार्थना केली, की जोधपूर राज्यास त्यांचा चरणस्पर्श घडावा. वातावरण निवळेल, राजा सुधारेल व प्रजा सुखावेल. त्यांचा अंदाज खरा ठरण्याची वेळ आली. एवढ्यात एका महिलेचा मायावीपणा मार्गात आला. जयवंतसिंहांची रखेली नन्ही भगत आणि तिचा कावेबाज गुरू गणेशपुरी हे दोघे महाराजांच्या स्वभावातील बदलामुळे कावरेबावरे झाले. त्यांची भ्रष्टता जगाच्या नजरेस पडेल, अशी भीती त्यांना वाटली. या दोघांनी डाव रचला. स्वामीजींचा आचारी बलदेव यास वश करून घेतले, त्याला मोठे इनाम देऊ केले आणि मोठ्या कुशलतेने स्वामीजींवर विषप्रयोग केला. स्वामीजी या प्रयोगास बळी पडले. त्याआधी दोन वेळेला स्वामींना विषबाधा घडली होती. काही योग प्रक्रियांनी शरीर शुद्ध करून त्यांनी मृत्यूला सीमेवरून परतवले होते. या वेळी मात्र स्वामींनी तसे काही केले नाही. दिनांक ३० ऑक्टोबर १८८३. मंगळवारचा दिवस! दिवाळीची आमावस्या! स्वामीजींनी आनंद नावाच्या आपल्या शिष्याला जवळ बोलावले. त्याच्या मस्तकावर हात ठेवून स्वामी म्हणाले, 'आनंदात राहा.' नंतर काही वेळ त्यांनी गायत्रीचा जप केला आणि 'विश्वानी देव' हा आपला आवडता वेदमंत्र म्हटला. मग थोडा वेळ स्वामींनी ध्यान केले. ध्यान संपले. त्यांनी आजूबाजूला पाहिले आणि नंतर स्वामीजी पहुडले. त्यांच्या चिरविश्रांतीचा तो क्षण ठरला.

स्वामीजी गेले; पण मागे विचारवंतांची, कार्यकर्त्यांची, समाजसेवकांची व राष्ट्रनिष्ठांची मांदियाळी ठेवून गेले. 'आर्य समाज' या संकल्पनेचा पुरस्कार करणारे असंख्य आबालवृद्ध स्वामीजींचे पाईक झाले. कृतार्थ जीवनाच्या शेवटी येणारे मरण हे अमरपणाचेच एक रूप असते, हे जगाला कळले ते महर्षींमुळेच. अशा या थोर स्वामी दयानंद सरस्वती यांना विनम्र अभिवादन.

**-डॉ. सुवर्णा नाईक-निंबाळकर**
**(इतिहास अभ्यासक, पुणे)**

# महान वैज्ञानिक डॉ. होमी भाभा



**होमी जहांगीर भाभा हे आपल्या देशांतील महान अणू वैज्ञानिक होते. त्यांनी केलेल्या अणु क्षेत्रांतील कामगिरी करिता त्यांना, भारत देशांतील अणू ऊर्जा कार्यक्रमाचे जनकदेखील म्हटल जाते. त्यांनी आपल्या संशोधनातून देशाच्या आण्विक कार्यक्रमाच्या भावी स्वरूपासाठी मजबूत पाया घातला, यामुळेच आज आपला भारत देश जगातील प्रमुख अणु-समृद्ध देशांच्या रांगेत उभा आहे.**

होमी भाभा यांनी आपल्या मुठभर शास्त्रज्ञांच्या सोबतीने अणु क्षेत्रांत संशोधन करण्यास सुरुवात केली. डॉ. भाभा यांनी अणु ऊर्जेची क्षमता आणि विविध क्षेत्रांत त्याच्या वापराची संभाव्य शक्यता याची चाचणी त्यांनी यापूर्वीच केली होती.

होमी भाभा या महान अणु वैज्ञानिकाचा जन्म ३० ऑक्टोबर १९०९ साली मुंबई येथील एका पारशी कुटुंबात झाला होता. डॉ. भाभा यांचे वडिल जहांगीर भाभा यांनी कैब्रीज विद्यापीठामधून शिक्षा प्राप्त केली होती. तसचं, पेशाने ते एक प्रसिद्ध वकील होते. शिवाय ते टाटा इंटरप्राईजेज कंपनीसाठी काम देखील करीत असतं. डॉ. भाभा यांच्या आई मेहेरेन या एका उच्च कुळातील महिला होत्या. डॉ. भाभा यांनी आपलं प्राथमिक शिक्षण कॅथेड्रल शाळेत पूर्ण केलं आणि त्यानंतर पुढील शिक्षणासाठीत्यांनी जॉन कॅनॉन शाळेत दाखला घेतला. डॉ. होमी भाभा यांची गणित आणि भौतिकशास्त्र विषयाप्रती सुरुवातीपासूनच रुची होती.

डॉ. होमी भाभा यांनी आपले महाविद्यालयीन शिक्षण एल्फिन्स्टन कॉलेज मुंबई आणि रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स महाविद्यालयातून पूर्ण केले. त्यांनी बी. एस. सी ही पदवी मिळवली. यानंतर सन १९२७ साली ते अभियांत्रिकेचे शिक्षण घेण्याकरिता इंग्लंडला गेले त्याठिकाणी त्यांनी कैब्रीज विद्यापीठातून आपली अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले. यानंतर सन १९३० साली त्यांनी पदवी संपादन केली आणि सन १९३४ साली केंब्रिज विद्यापीठातून डॉक्टरेट उपाधी ग्रहण केली.

सन १९३९ साली दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी डॉ. होमी भाभा आपल्या भारत देशांत परत आले होते. त्यावेळी त्यांची कारकीर्द संपूर्ण भारतभर पसरली होती. भारतात परत आल्यानंतर ते बंगळूर येथील इंडियन स्कूल ऑफ सायन्स सोबत जोडल्या गेले. सन १९४० साली डॉ. भाभा यांची रीडर पदी नियुक्ती केली गेली. यानंतर त्यांच्या आयुष्याला नवीन कलाटणी मिळाली. त्यांनी आपले संपूर्ण जीवन विज्ञान क्षेत्राच्या सेवेत व्यतित केलं. डॉ. भाभा यांनी कॉस्मिक किरणांचे संशोधन करण्यासाठी इंडियन स्कूल ऑफ साइंस बैंगलोर याठिकाणी त्यांनी वेगळ्या विंभागाची स्थापना केली.

सन १९४१ साली वयाच्या अवघ्या ३१ वर्षी डॉ. होमी भाभा यांची रॉयल सोसायटीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली. इंडियन स्कूल ऑफ सायन्सचे तत्कालीन अध्यक्ष आणि नोबल पारितोषिक विजेते प्रा. सी. व्ही. रमण हे देखील डॉ. होमी भाभा यांच्या कामगिरीवर खूप प्रभावित झाले होते. डॉ. होमी भाभा यांनी जे. आर. डी. टाटा यांच्या मदतीने मुंबई येथे 'टाटा इंस्टिट्यूट ऑफ़ फंडामेंटल रिसर्च' ची स्थापना केली आणि सन १९४५ साली त्या इंस्टिट्यूट चे निर्देशक बनले.

डॉ. होमी भाभा यांनी आपल्या कारकिर्दीत सन १९४८ साली भारतीय आणू ऊर्जा आयोगाची स्थापना करून आंतरराष्ट्रीय पातळीवर आणू ऊर्जा संबंधित कार्यक्रमात आपल्या देशाचे प्रतिनिधित्व केलं. अश्या या महान संशोधकाने आपल्या कर्तुत्वाच्या बळावर अणु ऊर्जा क्षेत्रांत आपल्या देशाला बळकटी देण्याचं महत्वपूर्ण काम केलं आहे. डॉ. भाभा यांना भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कारासाठी पाच वेळा नामांकित केलं गेल आहे, परंतु या महान वैज्ञानिकांना विज्ञान जगातील सर्वात मोठा सन्मान मिळू शकला नाही. भारत देशांतील या महान वैज्ञानिकाचे निधन सन २४ जानेवारी १९६६ साली स्वित्झर्लंडमध्ये एका विमान अपघातात झाले.

**(साभार : माजी मराठी)**



## बदलते तंत्रज्ञान

## तुम्हालाही येतात स्पॅम कॉल्स?; फोनमध्ये करा 'या' सोप्या सेटिंग

सायबर गुन्ह्यांमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. वेगवेगळ्या नंबरवरुन कॉल करून लोकांची आर्थिक फसवणूक करण्याची काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. नुकतेच हरियाणा पोलिसांनी अशाप्रकारे फसवणूक करणाऱ्यांवर कारवाई केली आहे. अशा गुन्ह्यांमध्ये वापरण्यात आलेले सुमारे २८ हजार स्पॅम क्रमांक पोलिसांनी शोधून काढले आहेत. पोलिसांनी २७,८३४ स्पॅम क्रमांक शोधले असून ते लवकरच ब्लॉक केले जातील असा दावा केला आहे. पोलीस लवकरच हे क्रमांक सायबरसेफ पोर्टलवर अपलोड करणार आहेत. या यादीतील बहुतांश क्रमांक गुरुग्राममधून चालवले जात होते. त्यापाठोपाठ फरिदाबाद आणि इतर शहरांची नावे स्पॅम कॉलमध्ये समोर आली आहेत.




फसवणूक करणारे तुमच्या क्रेडिट कार्डला ब्लॉक किंवा बँकेकडून पैसे कपातीच्या नावाने कॉल करू शकतात. पहिली गोष्ट म्हणजे तुम्ही घाबरून तुमची कोणतीही माहिती फसवणूक करणाऱ्यांसोबत शेअर करू नका. तुमच्या बँकिंग आणि इतर खात्यांसाठी टू-फॅक्टर सेटिंग चालू ठेवा. यामुळे, इतर कोणीही तुमचे खाते सहजपणे हॅक करू शकणार नाही. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तुम्ही तुमचा ओटीपी इतर कोणाशीही शेअर करू नका. आजकाल ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवरून वस्तू आल्यावरही OTP येतो. या दोन OTP मधील फरक समजून घ्या. बँकेचा कोणताही अधिकारी फोन करुन तुम्हाला तुमची वैयक्तिक माहिती विचारत नाही.

तुम्ही अ‍ॅन्ड्रॉइड फोनवर स्पॅम कॉल्स आपोआप ब्लॉक करू शकता. यासाठी तुमच्या फोनमध्ये गुगल डायलर असायला हवे. जर तुमचे डिफॉल्ट अ‍ॅप गुगल डायलर असेल तर तुम्ही सेटिंग्जमध्ये जाऊन सहजपणे स्पॅम कॉल ब्लॉक करू शकता. यासाठी गुगल डायलर ओपन करून सेटिंगमध्ये गेल्यावर वरच्या उजव्या कोपऱ्यातील तीन बिंदूंवर क्लिक करा. काही पर्याय तुमच्या समोर येतील, ज्यामध्ये सेटिंगही असेल. सेटिंगवर क्लिक केल्यावर तुम्हाला कॉलर आयडी आणि स्पॅमचा पर्याय मिळेल. तुम्हाला यावर क्लिक करावे लागेल. येथे तुम्हाला सी कॉलर आणि स्पॅम आयडीचे टॉगल चालू करावे लागेल. त्यानंतर फिल्टर स्पॅम कॉल्सचा पर्याय चालू करावा लागेल. यामुळे फोनवर येणारे स्पॅम कॉल्स आपोआप ब्लॉक होतील. फक्त तेच स्पॅम कॉल ब्लॉक केले जातील, ज्यांना लोकांनी स्पॅम म्हणून घोषित केले आहे.

# काटकसर मोलाची; आज जागतिक बचत दिन

**निमित्त**

आज 'जागतिक बचत दिन'. इटालियन प्राध्यापक 'फिलिपो रॅव्हिझा' यांनी हा दिवस 'आंतरराष्ट्रीय बचत दिन' म्हणून जाहीर केला. ३१ ऑक्टोबर १९४२ रोजी हा दिवस मिलानो, इटली येथील पहिल्या 'आंतरराष्ट्रीय काँग्रेस बचत बँक दरम्यान स्थापित करण्यात आला.

'जागतिक बचत दिन' हा जगभर ३१ ऑक्टोबरला साजरा केला जातो. भारतामध्येही पूर्वी हा दिवस ३१ ऑक्टोबरलाच साजरा होत असे. परंतु १९८४ साली दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे ३१ ऑक्टोबरला निधन झाल्यामुळे त्यानंतर भारतामध्ये 'जागतिक बचत दिन' ३० ऑक्टोबरला साजरा केला जातो.

प्रथम 'जागतिक बचत दिन' सन १९२५ मध्ये साजरा करण्यात आला. तर सन १९२५ मध्ये स्पेन व अमेरिकेत प्रथम 'राष्ट्रीय बचत दिन' साजरा केला गेला. चांगले जीवनमान मिळविण्यासाठी आणि अर्थव्यवस्थेची घडी सुरळीत चालण्यासाठी पैसे वाचवणे महत्वाचे आहे. त्याच अनुषंगाने जागतिक बचत दिवस अनेक देशांमध्ये खूप लोकप्रिय आहे आणि या आकर्षणाचे कारण म्हणजे बचत करण्यामध्ये सहसा अनेक अडथळे असतात.

मानवी स्वभाव म्हणजे हातात पैसा आला की, तो खर्च झालाच म्हणून समजा. गरजेपेक्षा हौस महत्त्वाची ठरत असली, तरी भविष्याचे नियोजनही तेवढेच महत्त्वाचे ठरते. गरजेला महत्त्व देतानाही काटकसर करण्याकडे मात्र दुर्लक्ष नकोच नको. अनेकजण काटकसरीला



कदाचित कंजूषपणा' असे बिरूद लावतील; पण हा कंजूषपणा' म्हणजे खर्चाला काट' देत केलेली एकप्रकारची कमाईच आहे. इंग्रजीत एक म्हण आहे, मनी सेव्ह इज मनी अर्नड्'. काटकसरीची कसरत स्वयंपाकघरापासून करत वीज आणि इंधन बचतीची प्रवृत्ती विकासाकडे घेऊन जाणारी आहे. अर्थात काटकसरीचा गुण महिलांमध्ये जन्मजातच असतो. म्हणून किचन किंग' म्हणून महिलांची ओळख आजही कायम आहे. देशाच्या प्रगतीत नागरिकांचेही सक्षमीकरण लपले आहे. हाच धागा पकडून इटलीमध्ये ३० ऑक्टोबर १९२४ साली आंतरराष्ट्रीय बचत बँकेची स्थापना करण्यात आली. कार्यक्रम सुरू असताना एका इटालियन प्रोफेसरकडून कार्यक्रमाच्या शेवटी आंतरराष्ट्रीय बचत दिन' घोषित केला. तेव्हापासून जागतिक बचत दिन अर्थात काटकसर दिन पाळला जातो. काटकसरीच्या माध्यमातून देशाची अर्थव्यवस्था बळकट होण्याला मदत मिळते, हा मुख्य हेतू यामागे होता.

खर्चाचे नियोजन न करता मनमौजीपणे पैसा उधळल्यास हातात शून्य' उरते. बचतीऐवजी उसणवारीवर जगण्याची वेळ येते. यातूनच सावकारी पद्धत पुढे येते. केवळ पैशाचीच नव्हे, तर वीज, पाणी, इंधन बचत करून काटकसर दिन साजरा करावा, अशी अपेक्षा डॉ. तारकेश्वर गोडघाटे यांनी व्यक्त केली. बचतगटांची क्रांती काटकसर दिनाचे प्रतीक अलीकडे खाण्या-पिण्याच्या सवयी बदलल्यात. आकर्षक राहणीमान तसेच मॉलसंस्कृती आल्यापासून खरेदीला उधाण आले. जी वस्तू बाहेर दोनशे रुपयाला मिळते, ती वस्तू तिथे चारशे रुपयाला मिळते. मग काटकसर कशी होईल. जिथे दोन पैसे वाचावे असे वाटते, तिथे अधिकचे पैसे खर्च होतात. अशावेळी बचतगटासारखे पर्याय पुढे आले आहेत. हे बचतगटही महिलांनीच तयार केले असून, उपराजधानीत आजघडीला चार हजारांवर बचतगट आहेत.

***कशी करावी बचत***

*वेतनातील पाच टक्के रक्कम बँकेत जमा करावी. बचतगट, पोस्टात आवर्त ठेव गुंतवणूक करावी. सौरऊर्जेतून आणि कामापुरताच वीज वापर करावा. कमी अंतरासाठी सायकलचा वापर करावा. भूखंड, सोने खरेदीतून बचत करावी*

***काय करू नये***

*विनाकारण परदेश प्रवास टाळावा. छोट्या-छोट्या कारणासाठी मोटार काढू नये. वाहनाचा वेग नियंत्रित केल्यास इंधनाची बचत होते. उगाच विद्युत उपकरणे सुरू ठेवू नये.*

**(साभार : लोकशाही स्पेशल व एव्हीएसविशेषदिन)**

**क्लिक...क्लिक...!**



**अलिबाग : दिवाळीतील सुटीचा आनंद घेण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने बाहेर पडले आहेत. पर्यटकांनी रायगड जिल्ह्याला पसंती दिली आहे. त्यामुळे रायगडातील पर्यटनस्थळे विशेषत: समुद्रकिनारे गर्दीने फुलून गेले आहेत.** (छाया : जितू शिगवण)

## आरोग्य प्रहर

## मुलांमध्ये वाढतोय डोळ्यांचा त्रास; फॉलो करा 'या' टिप्स



लहान मुलांना वेगवेगळी गॅझेट्स, फोन, टीव्ही आणि लॅपटॉपवर गेम्स खेळायला खूप आवडतात. मात्र स्क्रीनवर जास्त वेळ घालवल्याने मुलांच्या डोळ्यांवर परिणाम होऊ शकतो. मुलांची दृष्टी कमकुवत झाल्यास डोळ्यांमध्ये वेदना होणे, अंधुक दिसणे आणि डोक्यात वेदना होणे अशी अनेक लक्षणे दिसू लागतात. स्क्रीनवर सतत वेळ घालवल्याने लहान वयातच मुलांना चष्मा लागतो. टीव्ही किंवा मोबाईलवर जास्त वेळ घालवण्याची मुलांची सवय वेळीच सोडवली तर ही समस्या रोखण्यात यश मिळू शकते.

मुलांच्या आहाराची घ्या काळजी – आहारात पोषक तत्वांचा अभाव असेल तर आपली दृष्टी कमकुवत होऊ शकते. अशा परिस्थिती मुलांच्या आहारात व्हिटॅमिन ए, सी, ई आणि झिंक अँटी-ऑक्सीडेंट्स या पोषक तत्वांचा समावेश असला पाहिजे. डोळ्यांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी ओमेगा-३ फॅटी सिडही खूप महत्वाचे असते. यासाठी तुम्ही मुलांच्या आहारात गाजर, ब्रोकोली, पालक, स्ट्रॉबेरी आणि रताळं यांचा समावेश करू शकता.

**गॅझेट्सपासून ठेवा दूर** – मुलांच्या डोळ्यांचे सर्वात जास्त नुकसान गॅझेट्समुळे होते. ही गॅझेट्स मुलांची दृष्टी कमकुवत करण्याचे कार्य करते. अशा परिस्थितीत पालकांनी मुलांना गॅझेट्सचा अतिवापर करण्यापासून रोखले पाहिजे. याकरिता मुलांसाठी थोडा वेळ राखून ठेवावा आणि त्यांच्यासोबत विविध माइंड गेम्स खेळावेत.

**मुलांच्या डोळ्यांची करा तपासणी** – डोळे हे आपल्या शरीराचा महत्वाचा आणि नाजूक अवयव आहेत. अशा परिस्थितीत वेळोवेळी डोळ्यांची तपासणी करून घेत रहावी. त्यामुळे डोळ्याची काही समस्या उद्भवली तर त्याचे निदान वेळीच होईल आणि त्यावर उपचारही करता येतील. डॉक्टरांच्या सांगण्यानुसार, दर सहा महिन्यांनी डोळ्यांची तपासणी करून घेणे अत्यावश्यक आहे. त्यामुळेच पालकांनी त्यांच्या मुलांचे डोळेही तपासून घ्यावेत. त्याशिवाय मुलांच्या आहारात ए व्हिटॅमिन भरपूर प्रमाणात असावे.

**(या लेखामध्ये देण्यात आलेली माहिती आणि उपाय हे सामान्य ज्ञानावर आधारित आहेत. ते अवलंबण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा.)**

## भाजप नेते कृष्णा कोबनाक यांच्या हस्ते

# म्हसळ्यात विकासकामांचे भूमिपूजन





**म्हसळा : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून म्हसळा तालुक्यातील पाष्टी–मोरवणे आणि सावर–चिरगाव–बागाचीवाडी या दोन रस्त्यांचे काम करण्यात येत आहे. या कामाचे भूमिपूजन भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य कृष्णा कोबनाक यांच्या हस्ते शनिवारी (दि. २९) करण्यात आले. राज्यात शिंदे–फडणवीस सरकार आल्यापासून आता विकासकामे सुसाट वेगाने होत असल्याचा दावा कोबनाक यांनी या वेळी केला.

देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात मंजूर झालेल्या म्हसळा तालुक्यातील पाष्टी–मोरवणे आणि सावर–चिरगाव–बागाचीवाडी या रस्त्यांची कामे मागील अडीच वर्षे रखडली होती, पण राज्यात सत्ता परिवर्तन झाल्यानंतर भाजप नेते कृष्णा कोबनाक यांनी पाठपुरावा केल्याने या रस्त्यांच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे.

या मतदारसंघातील अनेक शासकीय कामांची अशासकीय भूमिपूजने करून विद्यमान खासदार आणि माजी पालकमंत्र्यांनी लोकांची दिशाभूल करू नये. त्यांनी आपल्या खासदार व आमदार निधीतून काय विकासकामे केली याबाबत जनतेला माहिती द्यावी आणि विकासकामांचे खोटे श्रेय घेणे बंद करावे, अशी टीका कोबनाक यांनी या वेळी केली.

केंद्रात व राज्यात आता आमचे सरकार आहे व अनेक योजना सुरू आहेत, मात्र स्थानिक खासदार आणि आमदार केंद्र व राज्य शासनाने मंजुरी दिलेल्या कामांचे खोटे श्रेय घेण्यासाठी पुढे आहेत. त्यांनी आता असले धंदे बंद करावेत, असा इशाराही कोबनाक यांनी या वेळी दिला.

हर घर जल, या जल जीवन मिशन योजनेंतर्गत केंद्र व राज्य सरकारद्वारे पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहेत, मात्र येथील खासदार त्यांच्या कार्यकर्त्यांसमावेत भूमिपूजने करून मनोरंजन करीत आहेत. यापासून जनतेने सावध रहावे, असे कोबनाक यांनी सांगितले.

भाजपचे म्हसळा तालुका अध्यक्ष प्रकाश रायकर, तालुका उपाध्यक्ष यशवंत म्हात्रे, मनोहर जाधव,तालुका सरचिटणीस समीर धनसे, महिला मोर्चा तालुका अध्यक्षा सुनंदा पाटील, कामिनी जोशी, युवामोर्चा तालुका अध्यक्ष शरद चव्हाण, जिल्हा चिटणीस योगेश महागावकर, माजी शहर अध्यक्ष मंगेश मुंडे, वाहतूक सेलचे तालुका अध्यक्ष विवेक ढवळे, किशोर गुलगुले, दिनेश काप, आतिफ उभारे, सुबोध पाटील, दिलीप कोबनाक, पंकज भाये, रावजी घाणेकर, शंकर निर्मल, महादेव बेंडूक, सुधाकर शिर्के, मांदाटणे सरपंच चंद्रकांत पवार, ग्रामपंचायत सदस्य धनश्री मुंडे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माणकीवली–शेणगाव मार्गावर धुळीचे साम्राज्य

## ग्रामस्थ हैराण, आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर!



**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ग्रामीण भागांना जोडणाऱ्या बहुतांशी रस्त्यांची अक्षरश: चाळण झाली असून, लहानमोठ्या अपघातांबरोबर वाहतूक कोंडीचा प्रश्न उद्भवत आहे. दैनंदिन त्रासामुळे नागरिकांसह प्रवासी, वाहन चालक कमालीचे नाराज आहेत. त्यातच तालुक्यातील माणकीवली–शेणगाव मार्गाची दूरावस्था झाली असून, या मार्गावर मोठ्या प्रमाणात धुळीचे साम्राज्य पसरले आहे. या धुळीने हैराण झाल्याने ग्रामस्थ संताप व्यक्त करीत आहेत.

या भागातील खडी मशीन चालक काही लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांना हाताशी धरत परिसरातील नागरिकांची दिशाभूल करीत आहेत. संबंधित प्रशासनाचे कोणताही वचक राहिला नसल्याने खडी मिशन चालकाचे फावत चालले असले. संबंधित प्रशासनाने नियमांचे उल्लंघन करणाऱ्या खडी मशीन चालकांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी सध्या जोर धरत आहे.

प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून लाखो रुपयांचा निधी वापरून सन २०१७ मध्ये माणकीवली–शेणगाव रस्त्याचे नुतनीकरण करण्यात आले होते, परंतु रस्त्याच्या क्षमतेपेक्षा अती वजनी वाहन ये–जा करीत असल्याने या रस्त्याची अवस्था अक्षरशः चाळणमय झाली आहे. आधीच हा रस्ता अरुंद त्यात खड्ड्यांचे साम्राज्य त्यामुळे मोठी कसरत करून नागरिकांना या रस्त्यावर प्रवास करावा लागत आहे. या रस्त्यावर धुळीचे साम्राज्य पसरत असल्याने वाहन चालक, प्रवासी, पादचारी वर्गाला श्वसनाचा त्रास होत असल्याचे पाहावयास मिळत आहे. संबंधित प्रशासनाने यावर उपाययोजना राबवून खडी मशीन चालकांवर कारवाई करावी, अशी मागणी सध्या जोर धरत आहे.

**माणकीवली ग्रामपंचायत हद्दीतील खडी मशीनमुळे होणाऱ्या सर्व त्रासाची माहिती तहसीलदार आयुब तांबोळी यांना निवेदनाद्वारे दिली असून, कारवाईची मागणी केली आहे. तसेच शेणगाव–माणकीवली मार्गाची मोठ्या प्रमाणात चाळण झाल्याने मोठ्या प्रमाणात धुळीचे साम्राज्य पसरू लागले आहे. संबंधित प्रशासनाने यावर उपाययोजना राबवाव्यात तसेच खडी मशीन चालकावर कारवाई करून ओव्हरलोड वाहतूक बंद करावी.**

**–समाधान दिसले,**
**सामाजिक कार्यकर्ते,**
**माणकीवली, ता. खालापूर**

# पालीच्या नगराध्यक्ष गीता पालरेचा भाजपच्या वाटेवर

**पाली : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष वसंत ओसवाल यांच्या कन्या आणि पालीच्या नगराध्यक्ष गीता पालरेचा लवकरच राष्ट्रवादी काँग्रेसचे 'घड्याळ' सोडून भाजपचे 'कमळ' हाती घेणार आहेत. नगरपंचायत निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न करणे तसेच राष्ट्रवादीचे घटते प्राबल्य यामुळे भाजपत प्रवेश करणार असल्याची माहिती खुद्द गीता पालरेचा यांनी शनिवारी (दि. २९) दिली.

गीता पालरेचा यांच्या भाजपमध्ये जाण्याच्या निर्णयामुळे नाना प्रकारच्या चर्चांना उधाण आले आहे. पाली नगरपंचायतीत राष्ट्रवादी व शेकाप आघाडीची सत्ता आहे. पालरेचा यांच्या भाजपत जाण्याने या आघाडीचे काय होणार? नगरपंचायतीमधील सत्तेचे काय होणार या विचाराने कार्यकर्ते संभ्रमात आहेत. काही कार्यकर्ते गीताताई आप आगे बढो हम तुम्हारे साथ है, या भूमिकेत असल्याचे दिसून येते.

# चौक येथे चौकडीने परस्पर विकल्या चारचाकी; फसवणुकीचा गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

सेल्स एक्झिक्युटीव्ह म्हणून नोकरीस असलेल्या पांडुरंग अशोक धोत्रे, बाळाराम शांताराम गायकवाड, रवींद्र दशरथ मसणे आणि एक अज्ञात आरोपीने कंपनीच्या नकळत गाड्यांची विक्री केल्याचा प्रकार खालापूर तालुक्यातील चौक येथे घडला.

मिळालेल्या माहितीनुसार पांडुरंग अशोक धोत्रे, बाळाराम शांताराम गायकवाड, रवींद्र दशरथ मसणे आणि एक अज्ञात आरोपी हे चौक येथील ट्रयु व्हॅल्यू कंपनीमध्ये सेल्स एक्झिक्युटीव्ह म्हणून नोकरीस आहेत. कंपनीने विक्रीसाठी गाड्या आणल्या होत्या. त्या गाड्या कंपनीने गोडावूनमध्ये उभ्या करुन ठेवल्या होत्या. त्या गाड्यांची विक्री व देखरेखीची जबाबदारी आरोपीवर होती. मात्र त्या चौघांनी गाड्यांची विक्री करून ग्राहकांकडून पैसे घेतले. मात्र ते पैसे कंपनीमध्ये भरले नाहीत. कंपनीस गाडीविक्रीबाबत काही माहिती न देता कंपनीची फसवणूक केली.

याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक फौजदार मोहन बहाडकर करीत आहेत

# झुगरेवाडी शाळेच्या सुसज्ज इमारतीबद्दल जिल्हा परिषदेला अभिमान -डॉ. किरण पाटील

**कर्जत : प्रतिनिधी**

उद्योग, व्यवसाय यांच्याकडून सीएसआर द्या आणि त्या निधीचा वापर आमच्याशी बोलून करा, अशा केवळ सूचना आम्ही करतो, त्यानंतर सर्वसमावेशक काम उभे राहते. मात्र रोटरी क्लब ऑफ वरळी मुंबई या सेवाभावी संस्थेने झुगरेवाडी येथील प्राथमिक शाळेची इमारत ज्या पद्धतीने उभारली आहे, त्याचे जिल्हा परिषदेला निश्चितच अभिमान वाटत राहील, असे प्रतिपादन रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ वरळी मुंबई या सेवाभावी संस्थेने झुगरेवाडी येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेची दुमजली इमारात उभारली आहे. या इमारतीचे लोकार्पण नांदगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंच सरिता पादिर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात डॉ. किरण पाटील बोलत होते.



सुरुवातीला झुगरेवाडी येथील आदिवासी नृत्य मंडळाने बाल्या नृत्य सादर केले. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने झाली. शाळेचे मुख्याध्यापक रवी काजळे यांनी स्वागत केले. यावेळी इमारतीचे बांधकाम ठेकेदार गुर्जर आणि अभियंता म्हसे यांचा सत्कार करण्यात आला. रोटरीकडून सर्व विद्यार्थ्यांना दफ्तर, पुस्तके आणि अन्य शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

ग्रामीण भागातील प्रयोगशील आणि टेक्नॉलॉजीचा वापर करणाऱ्या शिक्षकांच्यामुळे शिक्षण विभागदेखील बदलाच्या प्रक्रियेतून जात आहे. त्यास आम्ही पाठिंबा देत आहोत, असे प्रतिपादन राज्याच्या शिक्षण उपसंचालक डॉ. नेहा बेलसरे यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय शिंदे यांनी केले. माजी आमदार दिगंबर विशे, रोटरीचे मुंबई डिस्ट्रिक्ट गव्हर्नर संदीप अग्रवाल, जिल्हा शिक्षण अधिकारी डॉ. पूनित गुरव, गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे, आदिवासी विकास विभागाचे पेण प्रकल्पाचे माजी अध्यक्ष संजय सावळा, तालुका गटशिक्षण अधिकारी सुरेखा हिरवे, राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त विक्रम अडसूळ, रोटरी क्लब वरळीचे सचिव सचिन संघवी, खजिनदार जयेश रुपारेल, दीप्ती राजडा, निमेश सिंघरिका, झुगरेवाडी प्रकल्पाच्या प्रमुख कविता गोडबोले, विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ उपस्थित होते.

# कर्जतमध्ये जीवनविद्या मिशनच्या आनंद मेळाव्याचा शुभारंभ

**कर्जत : प्रतिनिधी**

सद्गुरू श्री वामनराव पै यांच्या जन्मशताब्दी निमित्त शनिवारी (दि. २९) कर्जतच्या जीवनविद्या ज्ञानपीठात आंनद मेळाव्याचा शुभारंभ करण्यात आला. २०२२–२३ हे वर्ष सद्गुरू वामनराव पै यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे.

कर्जत येथील सुखाचे प्रवेशद्वार असलेल्या जीवनविद्या ज्ञानपीठात आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याचे उद्घाटन जीवनविद्या मिशनचे विश्वस्त प्रल्हाद पै यांच्या हस्ते करण्यात आले. जीवनविद्या मिशनचे ज्येष्ठ प्रबोधक आणि माजी विश्वस्त शिवाजीराव पालव तसेच माजी विश्वस्त आणि ज्येष्ठ नामधारक विश्वासराव देशपांडे यांचा या वेळी जीवनगौरव पुरस्कार देऊन



सन्मान करण्यात आला. तसेच दीपस्तंभ फाउंडेशनचे अध्यक्ष यजुवेंद्र महाजन यांचे व्याख्यान झाले. जीवनविद्या मिशनने महाजन यांचा सत्कार केला.

यजुवेंद्र महाजन यांनी या वेळी जीवनविद्या मिशनचे प्रल्हाद वामनराव पै यांच्या कार्याचे कौतुक केले. तसेच 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' हा विचार अतिशय भावला. असे देखील ते यावेळी म्हणाले.

आयपीएस अधिकारी वैभव निंबाळकर यांनीदेखील या वेळी मार्गदर्शन केले.जीवनविद्या मिशनचे तत्वज्ञान आणि श्री सद्गुरूंचा आशिर्वाद यामुळे स्पर्धा परीक्षा पास होणे आणि तो संपूर्ण प्रवास सहज शक्य झाला. असे सांगून त्यांनी सद्गुरूंनी सांगितलेले सात 'क' त्यांच्या जीवनात किती महत्वाचे ठरले हे अनुभव बोल व्यक्त केले. युवा नामधारक सिद्धेश नारकर हा जागतिक कॅलेस्थॅनिक स्पर्धेत यश संपादन केले. त्याबद्दल प्रल्हाद पै यांनी त्याचे कौतुक केले आणि जीवनविद्या ही मानसिक अंपगत्वावर पुरक उत्तर असल्याचे सांगितले.

जीवनविद्या मिशन गेली अनेक वर्षे समाजसेवेच कार्य करत आहे. हे वर्ष वामनराव पै जन्मशताब्दी वर्षे म्हणून साजरे केले जाणार आहे. म्हणून प्रत्येक नामधारकाने ऑफिस, घर आणि समाजसेवेचे कार्य करत असताना 'प्रत्येक कृती ही राष्ट्रहिताची आणि विश्वशांतीची' हा संदेश लक्षात ठेवून कार्य करावे, असे मार्गदर्शन यावेळी प्रल्हाद वामनराव पै यांनी केले.

# पेण फेस्टिव्हलमध्ये अंधेरीची निशी यादव ठरली 'मिस रायगड'

## कामोठ्याची राणी जैसवाल द्वितीय, तर डोंबिवलीची धारा विसारिया तृतीय







**पेण : प्रतिनिधी**

स्वररंग तर्फे नगर परिषद मैदानावर आयोजित केलेल्या पेण फेस्टिवल २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या मिस रायगड स्पर्धेत अंधेरीची निशी यादव अंतिम विजेती ठरली. तर कामोठे नवी मुंबईची राणी जैसवाल हिने फस्ट रनरअपचे तर डोंबिवलीच्या धारा विसारिया हिने सेकंड रनरअपचे पारितोषिक पटकावले.

या स्पर्धेत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील एकूण २३ सौंदर्यवतींनी सहभाग घेतला होता. अंजली गायकवाड (बेस्ट कॅटवॉक), प्रतिभा गायकवाड (बेस्ट स्माईल), सृष्टी पाटील (बेस्ट हेअर), दीपिका सोलंकी (बेस्ट फोटोजनिक), खुशी जैन (बेस्ट पर्सनालीटी), सृष्टी म्हात्रे (बेस्ट कॉस्ट्यूम) या स्पर्धकांनी पारितोषिके जिंकली. सर्वानीच आपल्या मनमोहक अदा सादर करून रसिकांना मोहित केले. विजेत्यांना स्वररंगचे अध्यक्ष प्रा. राजेंद्र साळवी, भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, उद्योजक यशवंत घासे, भाजपचे नागोठणे शहर अध्यक्ष सचिन मोदी, शर्मिला पाटील, भारती साळवी, सुनिल पाटील, सचिव कौस्तुभ भिडे, देवा पेरवी, सारिका पाटील, अथर्व सावंत, अनिकेत साळवी, मृगज कुंभार, स्विटू पाटील आदि मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेची कोरिओग्राफी रुपेश चव्हाण (मुंबई) यांनी साकारली. तर ऋषी देसाई यांच्या उत्कृष्ठ समालोचनाची साथ या स्पर्धेला लाभली. परीक्षक म्हणून अक्षता साळवी, वृषाली मालेवडेकर, सिद्धार्थ साळवी व योगिता राठोड यांनी काम पाहिले. यावेळी साळवी क्लासेस लकी ड्रॉ स्पर्धेच्या विजेत्या दर्शना देशमुख व विजया म्हामुनकर यांचा पैठणी देवून सत्कार करण्यात आला.

# माथेरानमधील क्ले पेव्हर ब्लॉक रस्ते पर्यटकांसाठी सोयीचे

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरानमधील पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यामुळे पर्यटकांना आपल्या सामानाच्या वाहतुकीसाठी अवाजवी रक्कम देण्याऐवजी ते अगदी सहजपणे आपल्या बॅगा ओढून नेत आहेत.

माथेरान हे पर्यावरण दृष्ट्या संवेदनशील क्षेत्र घोषित झाल्यानंतर नवीन कामांना बंदी घालण्यात आली होती. रस्त्याची कामे करताना आजूबाजूच्या दगड मातीचेसुध्दा उत्खनन करता येत नव्हते त्यामुळे दरवर्षी इथे मोठ्या प्रमाणावर पर्जन्यवृष्टी होत असल्याने मातीची प्रचंड प्रमाणात धूप होत होती. धुळीमुळे येथील व्यापाऱ्यांच्या मालाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत होते तसेच धुळीमुळे नागरिकांना दमा, क्षय, थकवा अशा विविध आजारांचा सामना करावा लागत होता.



धूळ विरहित रस्त्यासाठी सनियंत्रण समितीने माथेरानमध्ये क्ले पेव्हर ब्लॉकला मान्यता दिली. सध्या दस्तुरी नाक्यापासून माथेरान रेल्वे स्टेशनपर्यंतच्या रस्त्यावर क्ले पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम पूर्ण होत आहेत. त्या पूढेही पांडे रोडपर्यंत क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांचे काम अपेक्षित आहे.

शहरातील महात्मा गांधी मार्ग या मुख्य रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविण्याची सुरुवात केली होती, त्यावेळी पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यावरून वरून घोडे घसरून पडतील, अशी भीती येथील घोडेवाल्यांना वाटत होती. त्यावेळी घोड्यांना चालण्यासाठी रस्त्याच्या मधोमध जुनाच मातीचा रस्ता ठेवण्यात आला होता. परंतु सद्यस्थितीत हेच घोडे पेव्हर ब्लॉकवरून सुसाट धावत असतात.

माथेरानमधील क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांमुळे मातीची धूप काही अंशी कमी झाली आहे. आणि पर्यटकांनाही या रस्त्यावरून आपले सामान ओढून नेणे सोयीस्कर झाले आहे.

# बांधकाम व्यवसायाला मिळणार नवसंजीवनी

## नवी मुंबईत विशेष समितीची स्थापना



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

विविध कारणांमुळे डबघाईला चाललेल्या नवी मुंबईतील रियल इस्टेट क्षेत्राला नवसंजीवनी देण्याच्या दृष्टीने नगरविकास विभागाने माजी मुख्य सचिव संजय कुमार यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती स्थापन केली आहे. ही समिती नैना, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासह सिडकोशी संबिधित येथील प्रकल्पग्रस्त आणि बांधकाम व्यावसायिकांच्या पाच प्रमुख अडचणींवर उपाय शोधून तसा अहवाल तीन महिन्याच्या आत शासनास सादर करणार आहे.

नगरविकास विभागाने घेतलेल्या या निर्णयामुळे डबघाईस आलेल्या रियल इस्टेट व्यवसायालला चालना मिळेल, तसेच ग्राहकांनाही त्याचा लाभ होईल, असा विश्वास विकासकांनी व्यक्त केला आहे. बजेटमधील घरांचे डेस्टिनेशन म्हणून पुष्पकनगर, नैनासह पनवेल आणि उरण परिसराकडे पाहिले जाते. परंतु. विविध कारणांमुळे येथील विकास प्रकल्पांना खीळ बसली आहे. त्यामुळे स्वस्त घरांच्या प्रतीक्षेत असलेल्या सर्वसामान्य ग्राहकांचीही कोंडी झाली आहे. यामुळे या समितीचा अहवाल बांधकाम व्यावसायिकांना नक्कीच उपयोगी ठरेणार आहे.

प्रकल्पग्रस्त भूधारकाला दिलेल्या वाढीव नुकसानभरपाईच्या अनुशंगाने वाटप केलेल्या १२/५ टक्के योजनेतील भहूखंडावर येणारी मोठी मावेजा रक्कम आणि त्या अनुशंगाने बांधकाम मुदतवाढीसाठी वाढणारे अतिरिक्त भाडेपट्टयाची रक्कम यावर निर्णय घेणे. अतिरिक्त भाडेपट्टा शुल्कासाठी आकारणीसाठी तब्बल ११५ टक्के दराबाबत या समितीस निर्णय घेण्यास सांगितले आहे. वास्तुविशारदाने बांधकाम परवानगी दाखला प्रमाणित केल्यानंतर वाट्टेल तसे अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क आकारून बिल्डरांची अडवणूक करण्यात येत आहे.

यावर योग्य तो निर्णय ही समिती घेणार आहे.तारण ना हरकत दाखल्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क नेमके किती असावे, ते बांधकाम व्यावसायिक, प्रकल्पग्रस्तास परवडणारे आहे, की नाही यावरही निर्णय घेणे विकसनशिल नोडमध्ये पायाभूत सुविधा पूर्ण होण्यास उशीर लागत असल्यास ओसी मिळण्यास विलंब होतो. परंतु, सिडकोच्या या चुकीचा फटका बांधकाम व्याविकास बसत आहे. ओसी मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे आकारण्या येणाऱ्या भाडेपट्टा शुल्कात सवलत देण्याची त्याची मागणी आहे. त्यावरही ही समिती अहवाल सादर करणार आहे. अशा विविध अडचणींवर समिती उपाय शोधणार आहे.

### समितीत 'यांचा' समावेश

**सेवानिवत्त मुख्य सचिव संजय कुमार यांच्यासह नगरविकास २ चे प्रधान सचिव, सिडकोचे सह-व्यवस्थापकिय संचालक आणि क्रेडाई, नवी मुंबई, संघटनेचा एक प्रतिनिधी अशा चौघा जणांची ही समिती राहणार आहे.**

# ग्रामीण भागात भातकापणीला वेग



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या काही दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतल्यानंतर ग्रामीण भागात भात कापणीच्या कामांना वेग आला आहे. यामुळे गेल्या काही दिवसांपासून शेतात थांबलेली कामे पुन्हा जोमात सुरू झाली आहेत.

पनवेल तालुक्यात बहरून आलेल्या भातपिकावर परतीच्या पावसाचे सावट पडल्याने बहुतेक ठिकाणी भातपिकांचे नुकसान झाले होते, पण गेल्या काही दिवसांत कडक ऊन पडल्याने आणि परतीचा पाऊस थांबल्याने ग्रामीण भागात शेतकरी मुला-बाळांसह शेतात भातकापणीची कामे करत आहे, तर काही ठिकाणी शेतकरी पावसाच्या भीतीने भात कापणी करून लगेचच झोडणीची कामेदेखील करीत आहे.

या वर्षी समाधानकारक पाऊस पडल्याने सर्वत्र भातपिकाचे चांगले उत्पन्न आले होते. कापणीयोग्य भात पीक आल्याने शेतकरी कापणीस सज्ज झाले. पण ऑक्टोबर महिन्यात काही दिवस जोरदार परतीचा पाऊस पडल्याने भात पिके आडवी पडली होती. काही पाण्याखाली जाऊन खराब झाली. पण सध्या उभे असलेले भातपीक कापून, झोडणी करून साठवण्याचे काम शेतकरी करत आहेत. रानशेत, उर्से, वरोती, वाघाडी, मुरबाड, सायवन, बापुगाव, तवा या परिसरात शेतकरी पहाटे लवकर उठून भातकापणी करीत आहेत.

**पावसामुळे अनेक ठिकाणी भातपिकाचे नुकसान झाले होते. त्याची माहिती कृषी विभाग, महसूल कर्मचारी यांनी घेतली आहे. पण नुकसानभरपाई मिळेल तेव्हा मिळेल, पण शेतात जे पीक आहे, त्याची कापणी सुरू आहे.**

**- राघू बसवत, शेतकरी**

**आता भाज्यांची लागवड**


***भाताची कापणी झाल्यानंतर शेतकरी पालेभाज्या, फळभाज्या, कडधान्यांची लागवड करतात. यासाठी शेतकरी झेंडू फुले, वांगी, चवळी, वाल, हरबरा, उडीद, मका, मिरची, कारले यांची लागवड कृषी विभागाच्या मदतीने करतात.***

# पनवेलसह नवी मुंबईत पसरली धुक्याची चादर

## हवेत जाणवतोय गारवा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई शहरात मागील दोन दिवसांपासून हवेत गारवा जाणवू लागला आहे. दिवाळी संपताच हवेत सकाळच्यावेळी धुके पसरत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. दिवाळीच्या आठवडाभरात शहरातील हवेचे तसेच ध्वनी प्रदुषण वाढळल्याची आकडेवारी आवाज व इतर संस्थांनी दिली आहे. नवी मुंबई शहराच्या एका दिशेला खाडी किनारा तर दुसरीकडे पारसिक डोंगररांगा आहेत. याच शहरात मोठा औद्योगिक पट्टा असल्याने शहरातील हवेच्या प्रदुषणात नेहमी चढउतार पाहायला मिळतो. नवी मुंबई महापालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात उद्याने व मैदाने आहेत .वातावरणात बदल होऊन गारवा निर्माण झाल्याने मोठ्या प्रमाणात मॉर्निंग वॉक करणाऱ्यांच्या पेहरावातही बदल दिसून येऊ लागला आहे. महापालिकेच्यावतीने तयार करण्यात आलेली उद्याने तसेच हरितपट्टे, त्याचबरोबर जॉगिंग ट्रॅक यांची संख्या मोठी आहे तर मॉर्निंग वॉक करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. वातावरणात थंडावा निर्माण झाला असून सकाळच्यावेळी शहरावर धुक्यांची चादर पसरल्याचे चित्र पाहायला मिळते. दिवसा मात्र उन्हाचा चटका लागत असून संध्याकाळी ४ नंतर व सकाळी हवेत गारवा अनुभवायला मिळत आहे.नियमितपणे मॉर्निंग वॉक करणाऱ्या दिनेश काटकर यांनी सांगीतले की, मागील दोन तीन दिवसापासून वातावरणात बदल झाला असून सकाळी थंडी पडत असून हवेत गारवा निर्माण झाला आहे.





कामोठे : सेक्टर १९ ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र येथे सर्वांनी एकत्र फराळ करून दिवाळी साजरी केली. या वेळी माजी नगरसेवक विजय चिपळेकर, कामोठे सरचिटणीस शरद जगताप, अनिल चव्हाण व सर्व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.




पनवेल : राजे शिवराय प्रतिष्ठानच्या वतीने नवीन पनवेल येथे सिंधुदुर्ग किल्ल्याची भव्य प्रतिकृती साकारण्यात आली आहे. या ठिकाणी स्त्रीशक्ती संघटन कार्यक्रमाद्वारे महिलांना एकत्र करून त्यांच्या हस्ते देवीची ओटी भरण्यात आली. या वेळी महिलांनी एकमेकीला हळद-कुंकू लावून आगामी काळातही विधायक कार्यासाठी एकवटण्याचा निर्धार केला.

# पनवेलच्या दांडेकर क्लिनिकला ५० वर्षे पूर्ण

**पनवेल : वार्ताहर**



डॉ. अरविंद दांडेकर व शैला दांडेकर यांनी १७ ऑक्टोबर १९७२ रोजी पनवेलसारख्या छोट्याशा जागेत दांडेकर क्लिनिक सुरू केले. पनवेल या ठिकाणी रिक्षा व अपुऱ्या सोयी सुविधा अशा ठिकाणी येऊन स्वतःचे क्लिनिक सुरू करून निरपेक्ष भावनेने कमी दरात दांडेकर क्लिनिक सुरू करण्यात आले.

डॉ. अरविंद दांडेकर व शैला दांडेकर यांनी सुरू केलेली ही परंपरा आज त्यांची मुलगी डॉक्टर कांचन दिवेकर व डॉक्टर अमोल दिवेकर यांनी चालू ठेवली आहे. १७ ऑक्टोबर १९७२ रोजी पासून या क्लिनिकमध्ये ऑटो क्लब मशीन स्वतःची लॅब होती त्यावेळेस सुद्धा सर्व प्रकारची ऑपरेशन्स होत होती पाइल्स ऑपरेशनशिवाय बोर्डिंग ट्रीटमेंट आजारावरही उपचार केले जात असत. ही सर्व ऑपरेशन गरज असेल तरच करण्याकडे कटाक्ष असायचे, किंबहुना औषधोपचार करून रुग्ण बरा कसा होईल यावर विशेष लक्ष देत होते डॉक्टर दांडेकर यांनी १९८० मध्ये दांडेकर क्लिनिक स्वतः च्या जागेत स्थलांतरित केले. काळानुसार लागणारे मशिनरी व त्याला अनुरूप असे शिक्षण डॉक्टरांनी चेन्नई हैदराबाद जपान येथे जाऊन घेतले. १९८९ मध्ये भारतातील दुसरे व महाराष्ट्रातील पहिले व्हिडिओ इंडॉस्कोपिंग मशीन घेतली व वाजवी दरात ट्रीटमेंट सुरू केली अनेक रुग्णांनी त्याचा लाभ घेतला पुढे १९८९मध्ये डॉक्टरांनी लॅप्रोस्कोपिक सर्जरी शिक्षण घेतले व त्यांचा लाभ त्या रुग्णांना होऊ लागला. १९९०मध्ये डॉक्टरांनी सर्जन सूची कॉन्फरन्स पनवेल येथे घेतली की ज्यांची रजिस्ट्रेशन फी रुपये २५० होती. त्यासाठी महाराष्ट्रातील तेराशे नामांकित डॉक्टरांनी उपस्थिती होते. या कॉन्फरन्स आजही आठवण काढली जाते १९९४मध्ये जपान येथे इंडोस्कोपिंग अल्ट्रासाउंड शिकून या पद्धतीने मार्गदर्शन डॉक्टर करत आहेत.


दांडेकर क्लिनिकमध्ये रुग्णांवर उपचार चालू असताना डॉक्टर पती-पत्नी श्रुतिका गृह ग्रामीण रुग्णालय येथील गावावरूनही उपचार घेत असतात. क्लिनिकमध्ये उपचार करत असताना डॉक्ट अरविंद दांडेकर डॉ. शैला दांडेकर यांनी आपला स्टाफ व पनवेलमध्ये तेव्हा असणाऱ्या विविध डॉक्टरांना बरोबर घेऊन पनवेचा आजूबाचा परिसर असणाऱ्या गावांमध्ये जाऊन निशुल्क वैद्यकीय सेवा औषध दिली व सर्व कॅम्प वैयक्तिकरित्या घेत असत, पण डॉक्टर रोटरीच्या माध्यमातूनही त्यांनी विविध गावात जाऊन रुग्ण सेवा देत असत.

डॉक्टरांनी आजपर्यंत लाखो रुपयांवर उपचार केले आहेत हे करत असताना भरपूर मनुष्य संग्रह केला त्यांनी, आजही दांडेकर क्लिनिकमध्ये विविध प्रकारचे सेवा पुरविली जातात वाजवी दरात सर्व प्रकारचे ऑपरेशन्स केले जातात.

वाशी मुंबईसारख्या ठिकाणी ज्या ट्रीटमेंटसाठी आठ ते दहा हजार होतात त्या ठिकाणी दांडेकर क्लिनिकमध्ये अडीच ते तीन हजार रुपये लागतात या सर्व पन्नास वर्षांच्या रुग्णांसेवेच्या कार्यात डॉ. दांडेकर (सर्जन) डॉ. शैला दांडेकर, (भूलतज्ज्ञ) डॉ. कांचन दिवेकर (स्त्रीरोगतज्ज्ञ) जावई डॉ. अमोल दिवेकर (अस्थिरोगतज्ज्ञ) यांची मोलाची साथ आहे, तसेच दांडेकर क्लिनिकमध्ये कार्यरत असणारा स्टाफ जो ३० ते ४० वर्षे त्यांच्याबरोबर कार्यरत आहे, अशा दांडेकर परिवाराकडून अशीच रुग्ण सेवा घडत राहो व सर्वांना निरोगी आयुष्य लाभो असे पनवेलकरांचे म्हणणे आहे.

# अंजीरच्या हंगामाला उशिरा सुरुवात

## लांबलेल्या परतीच्या पावसाचा परिणाम



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई कृषी उत्पन्न फळ बाजारात समितीत सध्या सफरचंद, डाळींब आणि सीताफळ या फळांचा हंगाम सुरू आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये अंजीर फळ बाजारात दाखल होण्यास सुरुवात होते, मात्र सततच्या पावसाने आगापच्या उत्पादनाला फटका बसला असल्याने अंजीर हंगामाला १५ दिवसांनी सुरुवात होईल. पुणे जिल्ह्यातील पुरंदर येथून आवक होत असून सध्या बाजारात अवघी एक गाडी दाखल होत आहे.

मागील वर्षी ऑक्टोबर अखेर- नोव्हेंबर सुरुवाती पासूनच १४ क्विंटलपर्यंत अंजीर बाजारात दाखल झाले होते. यंदा मात्र एकच गाडी दाखल होत आहे. अवकाळी पावसाने सुरुवातीच्या छाटणीला आलेल्या अंजीरला फटका बसला आहे. फळ परिपक्व होण्यास उशीर झाला आहे आणि त्यामुळे बाजारात अल्प प्रमाणात आवक होत असल्याचे मत घाऊक फळ व्यापारी व्यक्त करीत आहेत. गेल्या काही दिवसांत वातावरणात उष्ण दमट बदल होत होते. मध्येच जोरदार पाऊस तर मध्येच कडक उन्हाळा.

अंजीर फळाला थंड वातावरणात अधिक भर येत असतो. आता दोन दिवसांपासून वातावरणात गारवा जाणवत आहे. या फळ उत्पादनाला जास्त प्रमाणात पाण्याची आवशकता ही असते परंतु सततच्या पावसाचा मारा झाल्याने अतिरिक्त पाणी झाले होते. परिणामी अंजीर खराब झाले आहे. अशी माहिती व्यापारी संजय पिंपळे यांनी दिली आहे. त्यामुळे बाजारात अल्प प्रमाणात दाखल झाले आहे. नोव्हेंबर ते १५ फेब्रुवारीपर्यंत अंजिरचे हंगाम असून १० नोव्हेंबरनंतर अंजिरची आवक वाढण्यास सुरुवात होईल, असे व्यापाऱ्यांनी सांगितले. सध्या बाजारात एक गाडी दाखल होत असून ४० नगाला ३०० ते ४५० रुपये बाजारभाव आहे.

# साजगाव येथील विठ्ठल मंदिर देवस्थान कमिटीतील वाद विकोपाला

**खोपोली : प्रतिनिधी**

धाकटी पंढरी अशी ओळख असलेल्या साजगाव येथील श्री विठोबा देवस्थान-ताकई या कमिटीमधील वाद विकोपाला गेला आहे. या कमिटीत एकाच वेळी दोन अध्यक्ष कार्यरत आहेत. साजगावची प्रसिद्ध यात्रा काही दिवसांवर आली असतानाच देवस्थान कमिटीत वाद पेटल्याने सर्वजण संभ्रमावस्थेत आहेत. दुसरीकडे खोपोली नगरपालिका व पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने साजगाव यात्रा सर्व सुविधांयुक्त व भव्यदिव्य स्वरूपात पार पडेल, असा विश्वास देवस्थान कमिटीचे अध्यक्ष सुधीर पाटील यांनी व्यक्त केला आहे.

**दोन अध्यक्ष कार्यरत**

संत तुकाराम महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या साजगाव येथील विठ्ठल मंदिराची ओळख संपूर्ण महाराष्ट्रात धाकटी पंढरी अशी आहे. कार्तिकी एकादशीला येथे मोठी यात्रा भरते. १५ दिवस चालणाऱ्या या यात्रेला राज्यभरातून हजारो भाविक येतात. चार दिवसांवर यात्रा आली असून श्री विठोबा देवस्थान कमिटीच्या अध्यक्षपदाचा वाद उफाळून आला आहे.

या संदर्भात तोडगा काढण्यासाठी शुक्रवारी (दि. २८) दोन्ही गटांची एकत्रित बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला किशोर पाटील, अतुल पाटील, रामदास पाटील, अनंत पाटील, डॉ. हेमंत पाटील, आर. एस. पाटील, नरेंद्र शहा, प्रकाश शहाणे, तानाजी पाटील, काशीनाथ पाटील, संदेश पाटील, दिनेश पाटील, मंगेश पाटील, युगल पाटील, सनी पाटील, विवेक पाटील, संकेत पाटील यांच्यासह ताकई ग्रामस्थ



उपस्थित होते. या बैठकीत दोन्ही गटांनी व अध्यक्षांनी आपापला दावा कायम ठेवल्याने कोणताही अंतिम निर्णय झाला नाही.

वर्तमान स्थितीत सुधीर पाटील व अनंत पाटील या दोघांनीही अध्यक्ष पदावरील आपला दावा कायम ठेवला असल्याने, धर्मादाय आयुक्त यावर कोणती कार्यवाही करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# नाका कामगार रोजगाराच्या शोधात

## गवंडी, बिगारी, रंगारी, साफसफाई कामगारांवर उपासमारीची वेळ

**पाली : प्रतिनिधी**

कितीही आनंदाचा सण असो वा उत्सव मात्र समाजातील असेही काही घटक आहेत, ज्यांना दैनंदिन रोजगाराची भ्रांत पडलेली असते. वर्षाचे बाराही महिने त्यांना दिवसाच्या रोजगारासाठी झटावे लागते. सुधागड पालीतील नाक्यावर सकाळी कामगार येऊन बसतात. मात्र दुपार झाली तरी त्यातील बहुतांशी कामगारांना काम मिळत नाही.

नाका कामगार कर्नाटक, उत्तरप्रदेश, बिहार येथून आले आहेत. गवंडी, बिगारी, रंगारी, साफसफाई आदी रोजंदारीवर हे कामगार कामे करतात. आता बांधकामासह इतर कामे मंदावल्यामुळे नाकाकामगारांना हवे तसे काम मिळेनासे झाले आहे. मजुरीच्या दरात घट करुनही काम नसल्यामुळे नाक्यावरून निराश होऊन त्यांना माघारी परतावे लागत आहे. हाताला काम नसल्यामुळे उपासमारीची वेळ ओढावणार असल्याचे पालीतील एका नाकाकामगाराने सांगितले. पूर्वी सकाळी आठ ते नऊ वाजेपर्यंत मजुरांना काम मिळत होते. आता त्यासाठी दहा ते बारा वाजेपर्यंत थांबावे लागते, तरीही काम मिळण्याची शाश्वाती नसते, असे गोरखपूर येथून आलेल्या विक्रम यादव या नाकाकामगाराचे म्हणणे आहे.

आठवड्यातून तीन-चार दिवस काम मिळत आहे. त्यामुळे हातात पैसे राहत नाहीत. उसनवारी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करावा लागतो, असे सुजल लोखंडे या कामगाराचे म्हणणे आहे. पालीतील कृष्णा हा नाका कामगार सांगतो की, गावाकडे कामधंदा नसल्याने आम्ही नवरा-बायको येथे आलो, जेणेकरुन गावाकडे पैसे पाठवून मुलाबाळांना किमान दिवाळी साजरी करता येईल, पण तसे झाले नाही. या महिन्यात आतापर्यंत जेमतेम १२ दिवस रोजगार मिळाला.

**“काही मेहनतीची कामे करण्यासाठी स्थानिक कामगार मिळत नाहीत. ही कामे परप्रांतातून आलेले कामगार करतात. लांबलेला पावसाळा आणि नव्या बांधकामांना अद्याप वेग आलेला नसल्याने सध्या या नाका कामगारांना पुरेसा रोजगार उपलब्ध झालेला नाही.**

**-नितीन वाघमारे, लेबर कॉन्ट्रक्टर, पाली, ता. सुधागड**

# कर्जतमध्ये आयुर्वेदिक चिकित्सा शिबिर

## २९० जणांची तपासणी व उपचार

**कर्जत : प्रतिनिधी**

माजी आमदार स्वर्गीय तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान- कर्जत यांच्या विद्यमाने आणि ज्योविस आयुर्वेद दादर-मुंबई आणि नारी सामाजिक संघटना दादर-मुंबई यांच्या सहकार्याने कर्जत आमराई येथे शुक्रवारी (दि. २८) मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात २९० जणांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली.



माधव पाटणकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून शिबिराचे उद्‌घाटन करण्यात आले. ज्योविस आयुर्वेदचे डॉ. राज सातपुते, नारी सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष डॉ. ज्योती सातपुते, प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे, सचिव मनीषा सुर्वे, रवींद्र देशमुख आदी या वेळी उपस्थित होते.

यश सुर्वे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रतिष्ठानचे मुकेश सुर्वे यांनी प्रतिष्ठानच्या कार्याविषयी माहिती दिली.आयुर्वेद ही भारतीय संस्कृती आहे. पूर्वी आयुर्वेदिक उपचार केल्यावर त्याचा परिणाम खूप महिन्यांनी दिसत असे मात्र आता आयुर्वेदाचा खोलवर अभ्यास केल्यानंतर उपचार पद्धतीत बदल झाला असून काही व्याधींवर उपचार केल्यावर त्याचा परिणाम काही मिनिटातच दिसतो. आयुर्वेदाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. त्याला निश्चितच यश येईल, असा विश्वास डॉ. ज्योती सातपुते यांनी व्यक्त केला. डॉ. राज सातपुते आणि मुकादम यांनीही आपले विचार व्यक्त केले.

त्यांनतर १५ डॉक्टर आणि दहा हेल्थ कन्सल्टंट अशा २५ जणांनी २९० जणांची आरोग्य तपासणी केली. यावेळी चामखिळ्या, भोवऱ्या लगेचच काढण्यात आल्याने त्या रुग्णांना खूप आराम मिळाला. खांदेदुखी, पाठदुखी, कंबरदुखी यावर अग्निकर्म, रक्त मोक्षण, विद्धकर्म करून उपचार करण्यात आले. वात, पित्त यावरही उपचार करून मोफत औषधे देण्यात आली. अनेकांनी व्याधी बऱ्या होत असल्याने 'हे डॉक्टर म्हणजे आमच्यासाठी देवदूतच असल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

डॉ. अरुण पाटील, डॉ. अंजली पाटील, यशवंत गोरे, माजी नगराध्यक्ष वनिता म्हसे, अनंत देवळे, दिलीप गडकरी, लीना गावडे, यामिनी शिंदे, ज्योती पाटील, श्रेया वैद्य, अमिता मिस्त्री, माधव पाटील, महेश क्षीरसागर, मंजू हवालदार, संतोष पेरणे, संजय अभंगे, योगेश देशमुख आदी या वेळी उपस्थित होते.

# पाळीव प्राणी कत्तल प्रकरण; आरोपींना चार दिवसांची पोलीस कोठडी

**मुरुड : प्रतिनिधी**

गारंबी धरणाकडे जाणाऱ्या रस्त्यावर पाच पाळीव प्राण्यांची कत्तल केल्या प्रकरणी मुरुड पोलिसांनी गुरुवारी एजाज रमजान खान आणि सलमान सलीम शेख यांना ताब्यात घेतले होते. न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सूनावली आहे.

मुरुड तालुक्यातील गारंबी धरणाकडे जाणाऱ्या रस्त्याजवळील झुडपात काही अज्ञात इसमांनी पाच पाळीव प्राण्यांची कत्तल केल्याचे गस्तीवरील पोलिसांना गुरुवारी पहाटे आढळले. मात्र पोलिसांची चाहूल लागताच सर्व माल व हत्यारे तेथेच ठाकून काही कत्तलखोरांनी सफेद रंगाच्या इनोव्हा (एमएच-०४,सिटी-९१७६) गाडीतून पळ काढला तर काहीजण जंगलात पळून गेले होते. त्यापैकी जंगलात पळून गेलेल्या एजाज रमजान खान आणि सलमान सलीम शेख (रा. शिवडी, मुंबई ) यांना गुरुवारी रात्री उशीरा पोलिसांनी ताब्यात घेतले होते. या दोघांवर भादवि कलम ३७९,४२९ व महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा कायदा १९९५ चे कलम ५(ब),५(क),९,९(अ) खाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एजाज खान आणि सलमान शेख या आरोपींना मुरुड न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे.

दरम्यान, जंगलात पळून गेलेल्या आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश आले, मात्र इनोव्हा गाडीतून पोबारा केलेले आरोपी अद्याप सापडलेले नाहीत. मुरुड पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

# म्हसळ्यात उद्या एकता दौड




(संग्रहित छाया)

**म्हसळा : प्रतिनिधी**

देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची सोमवारी जयंती असून, हा दिवस 'राष्ट्रीय एकता दिन' म्हणून साजरा करण्याचे केंद्र आणि राज्य सरकारने ठरविले आहे. या राष्ट्रीय एकता दिनानिमित्त म्हसळ्यात सोमवारी (दि. ३१) एकता दौड आयोजित करण्यात आली आहे.

सरदार वल्लभभाई पटेल यांनी स्वातंत्र्य चळवळीत आणि त्यानंतर देशाची राष्ट्रीय एकात्मता साधण्यासाठी दिलेल्या योगदानाविषयी जनजागृती निर्माण व्हावी, असे सरकारला वाटते. सरदार पटेल हे भारताचे 'लोहपुरुष' म्हणून ओळखले जातात. स्वातंत्र्यानंतर खासगी संस्थानांचे भारतात विलिनीकरण घडवून आणण्यात त्यांनी मोलाची कामगिरी बजावली व त्यामुळे एकसंघ आधुनिक भारताची निर्मिती झाली. त्यामुळे सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती, राष्ट्रीय एकता दिन म्हणून साजरी करण्याचे केंद्र आणि राज्य सरकारने ठरविले आहे.

राष्ट्रीय एकता दिनानिमित्त म्हसळा तालुक्यात सोमवारी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्यात विविध ठिकाणी 'एकता दौड' (रन फॉर युनिटी) चे आयोजन करण्यात आले आहे. म्हसळा शहरातील जान्हवी (करडे) पेट्रोल पंपापासून एकता रॅलीचा शुभारंभ करण्यात येणार आहे. यामध्ये राष्ट्रीय एकतेची शपथ देण्यात येणार असल्याची माहिती निवासी नायब तहसीलदार जे. एम. तेलंगे यांनी दिली.



म्हसळा शहरातील एकता दौडमध्ये नगरपंचायतीचे नगराध्यक्ष, नगरसेवक आणि कर्मचारी सहभागी होणार असून, तालुक्यातील विविध ठिकाणी काढण्यात येणाऱ्या एकता दौडमध्ये महसूल आणि वनविभागाचे कर्मचारी, जि.प. आणि पं.स. चे कर्मचारी व माजी पदाधिकारी, विद्यमान आणि माजी सरपंच, पोलीस पाटील, पोलीस मित्र, दक्षता समिती व शांतता समिती सदस्य, शाळा-महाविद्यालयांचे सर्व शिक्षक आणि विद्यार्थी यांचा सहभाग रहाणार आहे.

प्राथमिक शिक्षण विभाग आणि ग्रामपंचायत विभागा मार्फत म्हसळा तालुक्यातील सर्व ग्रामपंचायती, प्राथमिक शाळांच्या माध्यमातून सोमवारी राष्ट्रीय एकतेची शपथ आणि एकता दौड या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याबाबत शासनाच्या सर्व संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या असल्याचे निवासी नायब तहसीलदार तेलंगे यांनी सांगितले.

# कर्जत किरवली येथे आज धम्मरॅली

## संभाजी भगत यांचा शाहिरी जलसा

**अलिबाग : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील किरवली येथे संजीवनी महिला बचतगटातर्फे आयोजित करण्यात आलेल्या वर्षावास कार्यक्रमाच्या सांगता सामरंभाच्या निमित्ताने रविवारी (दि. ३०) कठीण चिवरदान सोहळा व धम्मरॅली, संभाजी भगत यांचा शाहिरी जलसाचे आयोजन करण्यात आले आहे.

या वेळी भंते डॉ. एन. आनंद महाथेरो, भंते राहूल बोधी थेरो हे मार्गदर्शन करणार आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकापासून सकाळी ७ वाजता धम्मरॅली निघेल. त्यानंतर दुपारी १२ ते १ या कावाधीत कठिण चिवरदान, वैयक्तीक चिवरदान, आमंत्रीत वरिष्ठ भंतेजीकडून धम्मदेसना होईल. दुपारी १ ते २ या कालावधीत प्रत्येक सहभागी संस्था, संघटनांचे प्रतिनिधी व इच्छूक उपासक आपले मानोगत व्यक्त करतील.

रविवारी सायंकाळी ४ ते ५ या कालावधीत व्याख्यान होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बौध्द धम्म मिशन या विषयावर इतिहास अभ्यासक वसंत कोळंब मार्गदर्शन करणार आहेत. सायंकाळी ५ वाजता लोकशाहीर संभाजी भगत यांचा विद्रोही आंबेडकरी शाहिरी जलसा होईल.

# माणगाव पाटबंधारे खाते सेवानिवृत्त कर्मचारी संघाचा वर्धापन दिन उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका पाटबंधारे खाते सेवानिवृत्त कर्मचारी संघ या संघटनेचा आठवा वर्धापन दिन शनिवार (दि.२९) सकाळी येथील कुणबी भवनात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यासाठी मार्गदर्शन मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात ७५ वर्षे वय झालेल्या सभासदांचा जिल्हा कोषागार अधिकारी रमेश इंगळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

संघटनेचे अध्यक्ष नथुराम सखाराम पाष्टे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या वर्धापन दिन सोहळ्याचे प्रास्ताविक संघटनेचे उपाध्यक्ष शंकर पवार यांनी केले. त्यांनी संघटनेच्या वाटचालीचा आढावा घेतला.



सेवानिवृत्त कोषागार अधिकारी उद्धव जोशी यांनी या वेळी पेन्शन मिळण्यासाठी लागणारी आवश्यकती कागदपत्रे व अन्य काही गोष्टींची माहिती दिली. पेन्शनपासून वंचित असलेल्या सेवनिवृत्त कर्मचाऱ्यांच्या समस्यांचे आम्ही निराकरण करू, असे रमेश इंगळे यांनी सांगितले. संघटनेचे खजिनदार रामभाऊ टेंबे, कुणबी समाज विकास मंडळाचे तालुका अध्यक्ष महादेवराव बक्कम यांनीही या वेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

संघटनेचे सचिव बाळ उभारे, सहसचिव नारायण मालोरे, सल्लागार सुभाष दोशी, काशीराम पाखुर्डे, तसेच बाळाराम नवगण, विष्णू सावंत, भागोजी शिर्के, नथुराम अंधेरे, श्रीराम जाधव, लक्ष्मण मुंढे, सा. रा. पालकर, र. बा. शेडगे, गणपत पालकर, विनायक सापळे, शिवाजी वाढवळ, रमेश डवले, वि. रा. सावंत आदीं पदाधिकाऱ्यांसह सदस्य या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पेण तालुक्यात किल्ले बनविण्याची स्पर्धा

**धावटे येथील द्वीप खांडेकर यांच्या विसापूर किल्ल्याने पटकाविला पहिला क्रमांक**

**पेण : प्रतिनिधी**

दिवाळी निमित्ताने वृक्षमित्र प्रा. उदय शंकर मानकवळे यांनी पेण तालुक्याच्या पूर्व विभागातील ३० गावांमध्ये किल्ले बनविण्याची स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत धावटे येथील दीप खांडेकर याने बनविलेल्या विसापूर किल्ल्याने पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

या किल्ले बनविण्याच्या स्पर्धेत पेण पूर्व विभागातील ३० गावांमधील १९३ स्पर्धकांनी किल्ले साकारले होते. यामध्ये दीप संतोष खांडेकर (रा. धावटे, विसापूर किल्ला) प्रथम क्रमांक, विराज संजय उंबरे (रा. धावटे, लोहगड किल्ला) द्वितीय क्रमांक, विराज परशुराम बेकावडे (रा. मुंगोशी, लोहगड किल्ला) तृतीय क्रमांक, श्रवण वासुदेव पाटील (रा. हेटवणे, शिवनेरी किल्ला) चतुर्थ क्रमांक, तन्मय रुपेश इंदुलकर (रा. वाक्रुळ, सिंधुदुर्ग किल्ला) पाचवा क्रमांक मिळविला. प्रा. उदय शंकर मानकवळे गेली अकरा वर्षे या स्पर्धांचे आयोजन करीत आहेत.



# न्यूझीलंडचा श्रीलंकेवर मोठा विजय



**सिडनी : वृत्तसंस्था**

**टी-२० विश्वचषक स्पर्धेत शनिवारी (दि. २९) न्यूझीलंड संघाने आशिया चषक विजेत्या श्रीलंकेवर ६५ धावांनी विजय मिळविला. ग्लेन फिलिप्सच्या शतकी खेळीच्या जोरावर न्यूझीलंडने श्रीलंकेला १६८ धावांचे आव्हान दिले होते, ज्याचा पाठलाग करताना श्रीलंकेचा संघ १०२ धावांवर गारद झाला.**

न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. केन विल्यमसनने घेतलेला निर्णय 'किवी' संघालाच भारी पडला, कारण श्रीलंकेने पहिल्याच षटकांत सलामीवीर फिन लेनला स्वस्तात माघारी पाठवले. त्याच्यानंतर डेवोन कॉनवे (१), केन विलियमसन (८), डेरी मिचेल (२२) आणि जिमी नीशम (५) धावा करून बाद झाला. यानंतर ग्लेन फिलिप्सने एकट्याने किल्ला लढवत ६४ चेंडूंत १०४ धावांची तडाखेबंद शतकी खेळी केली. या जोरावर न्यूझीलंडने २० षटकांत ७ बाद १६७ धावा केल्या. श्रीलंकेकडून कसून रजिथाने सर्वाधिक दोन बळी टिपले, तर महेश थेक्षाना, धनंजया डी सिल्वा, वानिंदू हसरंगा व लाहिरु कुमार यांना प्रत्येकी एक गडी बाद केला.

१६८ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना श्रीलंकेला पहिल्यापासून झटके बसत गेले. संघाची धावसंख्या १ असताना पाथुम निसंका बाद झाला. त्याच्यापाठोपाठ कुसल मेंडिस तंबूत परतला. लक्षणीय बाब म्हणजे अवघ्या २४ धावांवर श्रीलंकेचा निम्मा संघ बाद झाला होता. श्रीलंकेचा कर्णधार दासुन शनाकाने ३५ धावांची सावध खेळी करून डाव सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र तोही संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. त्याला ट्रेन्ट बोल्टने बाहेरचा रस्ता दाखवला. त्याच्याव्यतिरिक्त भानुका राजपक्षेने २२ चेंडूंत ३४ धावांची ताबडतोब खेळी केली. लॉकी फर्ग्युसनने त्याला तंबूत पाठविले.

न्यूझीलंडकडून ट्रेन्ट बोल्टने सर्वाधिक चार बळी टिपले. मिचेल सँटनरने आणि ईश सोधी यांनी प्रत्येकी दोन, तर टीम साउदी आणि लॉकी फर्ग्युसन यांना प्रत्येकी एक गडी बाद करण्यात यश आले.

# महाराष्ट्राची वेटलिफ्टर आकांक्षा व्यवहारेचा नवा राष्ट्रीय विक्रम

**गाझियाबाद : वृत्तसंस्था**

खेलो इंडिया राष्ट्रीय मानांकन महिला वेटलिफ्टिंग स्पर्धेत मनमाडच्या आकांक्षा व्यवहारेने ४० किलो वजन गटात दहा महिन्यांपूर्वीच नोंदवलेला आपलाच राष्ट्रीय विक्रम मोडीत काढला. केंद्र सरकारच्या 'टॉप्स' योजनेची सदस्य असलेल्या आकांक्षाने स्नॅचमध्ये ६० किलो आणि क्लीन अँड जर्कमध्ये ७१ किलो असे एकूण १३१ किलो वजन उचलले.




ऑलिम्पिक पदकविजेत्या मीराबाई चानूला आदर्श मानणाऱ्या आकांक्षाने यापूर्वी जागतिक युवा स्पर्धेत रौप्य आणि आशियाई युवा स्पर्धेत कांस्यपदक मिळविले आहे. वयाच्या १३व्या वर्षांपासून वेटलिफ्टिंगकडे वळलेल्या आकांक्षाने काका प्रवीण व्यवहारे यांच्याकडे वेटलिफ्टिंगचे धडे घेतले. कोरोनाच्या काळानंतर पतियाळा येथे २०२१मध्ये झालेल्या युवा राष्ट्रीय स्पर्धेत तिने सुवर्णपदक पटकाविले. त्यानंतर भुवनेश्वर येथे या वर्षी जानेवारीत झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत आकांक्षाने सर्वप्रथम विक्रमाची नोंद केली होती.

खेलो इंडिया राष्ट्रीय मानांकन महिला वेटलिफ्टिंग स्पर्धेत आकांक्षाने स्नॅच, क्लीन अँड जर्क आणि एकूण वजन या तिन्ही विभागांमध्ये आकांक्षाने राष्ट्रीय विक्रम नोंदवला. विशेष म्हणजे आकांक्षाने जानेवारी २०२२मध्ये (५८+६९= १२७ किलो) नोंदवलेला आपलाच विक्रम मोडला. महाराष्ट्राच्याच सारिका शिनगारेने वरिष्ठ गटातील ४५ किलो वजनी गटात रौप्यपदक मिळवले.

# हरयाणा-पुणे सामना बरोबरीत

## प्रो कबड्डी लीग



**पुणे : प्रतिनिधी**

प्रो कबड्डी लीगमधील हरयाणा स्टीलर्सविरुद्धच्या रंगतदार सामन्यात पुणेरी पलटण संघाला २७-२७ अशा बरोबरीवर समाधान मानावे लागले. अखेरच्या सेकंदाला हरयाणाच्या चढाईपटूची पकड करताना पुणेरी पलटणचा एक बचावपटूही बाहेर गेला. त्यामुळे त्यांच्यावर पराभवाची नामुष्की ओढावली.

सामना संपण्यास पाच मिनिटे असताना पुणेरी पलटणवर लोण देण्याची संधी हरयाणाने अचूक साधली. या लोणनंतर २२-२४ अशा पिछाडीनंतरही पुणेरी संघाने २३-२६ अशी आघाडी मिळवली, मात्र दीड मिनिटे बाकी असताना मनजीतने बोनससह मिळालेल्या दोन गुणांनी हरयाणा संघाने २६-२६ अशी बरोबरी साधली. त्यानंतर अखेरच्या सेकंदाला तिसऱ्या चढाईच्या नियमात हरयाणा अडकले होते. त्यात त्यांच्या चढाईपटूची पकड झाली, पण पुण्याच्या खेळाडूंचा जोर आणि वेग त्यांना महागात पडला. चढाईपटूला बाहेर ढकलताना पुणेरी संघाचा एक बचावपटूही बाहेर गेल्याचे निर्देशित करीत पंचांनी दोन्ही संघांना एकेक गुण बहाल केल्यामुळे सामना २७-२७ असा बरोबरीतच राहिला. पुणेरीकडून मोहित गोयतने सर्वाधिक ११ गुण नोंदवले.

दुसऱ्या सामन्यात तमिळ थलायवाजने जयपूर पिंक पँथर्सचा ३८-२७ असा पराभव केला, तर दिवसातील अखेरच्या सामन्यात पाटणा पायरेट्सने यूपी योद्धाजवर ३४-२९ अशी मात केली.

# जोहोर चषक हॉकी स्पर्धेत भारतीय कुमार संघ अंतिम फेरीत

**जोहोर बारू : वृत्तसंस्था**

भारतीय कुमार हॉकी संघाने मलेशियात सुरू असलेल्या जोहोर चषक स्पर्धेतील सामन्यात गतविजेत्या ग्रेट ब्रिटनला ५-५ असे बरोबरीत रोखले. अन्य सामन्यात जपान आणि दक्षिण आफ्रिका या संघांना विजय मिळविण्यात अपयश आल्याने भारताने अंतिम फेरी गाठली.



ब्रिटनविरुद्ध भारताकडून श्रद्धानंद तिवारीने (५६ आणि ५८वे मिनिट) दोन, तर पूवन्नाल सी. बी. (सातवे मि.), अमनदीप (५०वे मि.) व अराजित सिंग हुंडाल (५३वे मि.) यांनी प्रत्येकी एक गोल नोंदवला. ग्रेट ब्रिटनकडून मॅक्स अँडरसनने (पहिले आणि ४०वे मि.), जामी गोल्डन (५४ आणि ५६वे मि.) हॅरिसन स्टोन (४२वे मि.) यांनी गोल केले.

# सूर्यकुमार हा तिन्ही फॉरमॅटचा खेळाडू

## माजी प्रशिक्षक रवी शास्त्रींचे मत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सूर्यकुमार यादवने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारतासाठी उशिराने पदार्पण केले, परंतु फार कमी वेळात तो भारतीय क्रिकेट संघातील एक प्रमुख फलंदाज बनला. भारताकडून एकदिवसीय आणि टी-२० क्रिकेट खेळणारा सूर्यकुमार यादव अद्याप कसोटी क्रिकेटमध्ये आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करू शकलेला नाही. टीम इंडियाचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी सूर्याचे कौतुक करताना तो तिन्ही फॉरमॅटचा खेळाडू असल्याचे म्हटले आहे.



टी-२० विश्वचषक स्पर्धेत नेदरलँड्सविरुद्धच्या सामन्यात सूर्यकुमार यादवने नाबाद ५१ धावा केल्या. या कामगिरीबद्दल त्याला सामनावीराचा किताब देण्यात आला. त्याचवेळी टीम इंडियाचे माजी प्रशिक्षक आणि क्रिकेटर तसेच समालोचक रवी शास्त्री यांनी त्यांच्याशी संवाद साधला. शास्त्री आणि सूर्यकुमार यांच्यातील या संभाषणाचा व्हिडीओ आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवर शेअर केला आहे. या संवादादरम्यान शास्त्री सूर्यकुमारबद्दल म्हणाले की, तो तीन फॉरमॅटचा खेळाडू आहे. शास्त्रींचे हे शब्द ऐकून सूर्यकुमार मोठ्याने हसला.

यानंतर शास्त्री म्हणाले, मला माहीत आहे की तो कसोटी क्रिकेटबद्दल स्वतःहून काही बोलणार नाही, पण तो कसोटी क्रिकेट खेळू शकतो. मी तुम्हाला खात्रीने सांगतो की सूर्या सर्वांना आश्चर्यचकित करून सोडेल. त्याला कसोटी क्रिकेटमध्ये पाचव्या क्रमांकावर फलंदाजीसाठी पाठवा. म्हणजे तो ताबडतोड फलंदाजी करेल आणि धावसंख्या वाढवण्यास मदत होईल.

यावर सूर्यकुमार यादवने उत्तर दिले की, जेव्हा मी पदार्पण करीत होतो तेव्हा त्यांनी (रवी शास्त्री) मला फोन केला आणि म्हणाले, 'जके बिंदास देना और ये मुझे याद है आणि अशीच फलंदाजी करायला मला आवडते.









**पनवेल : क्रिकेटचा नवा हंगाम सुरू झाला आहे. त्या अंतर्गत तालुक्यातील नागझरी येथे श्री कृष्ण स्पोर्ट्स आणि धानसर येथे जय गणेश्वर क्रिकेट संघाच्या वतीने आमदार चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेला भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, ओबीसी सेल तालुका उपाध्यक्ष शांताराम पाटील, तोंडरेचे माजी सरपंच राम पाटील, युवा नेते महेश पाटील, बूथ अध्यक्ष जितेंद्र पारधी आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.** (छाया : विकास म्हात्रे)

# टेनिसपटू राफेल नदाल पुन्हा कोर्टवर परतणार

**पॅरिस : वृत्तसंस्था**

स्पेनचा महान टेनिसपटू राफेल नदाल पुढील आठवड्यात होणाऱ्या पॅरिस मास्टर्स टेनिस स्पर्धेतून कोर्टवर परतणार आहे. त्याचे प्रशिक्षक कार्लोस मोया यांनी ही माहिती दिली.

दुखापतींसह नदालने यंदाचे १४वे फ्रेंच ओपन विजेतेपद जिंकले आणि पोटाच्या समस्येमुळे तो विम्बल्डनमधून बाहेर पडला. नदालने सप्टेंबरमध्ये सांगितले होते की, त्याला खेळातील काही गोष्टी दुरुस्त करण्याची गरज आहे. म्हणून तो पुन्हा कधी खेळेल याची चाहत्यांना खात्री वाटत नव्हती. विक्रमी २२ ग्रँडस्लॅम जेतेपदे जिंकणाऱ्या नदालने विम्बल्डनमधून माघार घेण्यापूर्वी गेल्या महिन्यात लेव्हर चषकात दुहेरीच्या सामन्यात रॉजर फेडररसोबत सामना खेळला होता. त्याने ८ ऑक्टोबर रोजी पत्नी मेरी पेरेलोसोबत आपल्या पहिल्या मुलाच्या जन्मासाठी सुटी घेतली होती.

पॅरिस मास्टर्सने पॅलेस ऑम्निस्पोर्ट्स डी पॅरिस-बर्सी येथे ३१ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या स्पर्धेचा ड्रॉ जाहीर केला. नदाल या स्पर्धेतून पुनरागमन करणार आहे. यूएस ओपनमधून



बाहेर पडल्यानंतर स्पर्धात्मक टेनिसमधील ही त्याची पहिलीच स्पर्धा असेल. या ड्रॉमध्ये नोवाक जोकोविचदेखील असेल, ज्याने या महिन्याच्या सुरुवातीला दोन विजेतेपदे जिंकली आहेत. सध्याच्या जागतिक क्रमवारीत स्पेनचा टेनिसपटू कार्लोस अल्काराझ अव्वल स्थानी आहे.

नदालने २००५, २००६, २००७, २००८, २०१०, २०११, २०१२, २०१३, २०१४, २०१७, २०१८, २०१९, २०२०, २०२२ अशी १४ वेळा फ्रेंच ओपन स्पर्धा जिंकली आहे. २००९ व २०२२ ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धा जिंकली. याशिवाय त्याने २००८ व २०१०मध्ये विम्बल्डन आणि २०१०, २०१३, २०१७, २०१९मध्ये यूएस खुल्या टेनिस स्पर्धेचा किताब जिंकला आहे.

# फिफा विश्वचषकासाठी भारताचीही तयारी

## कोझिकोडहून मोठा बूट कतारला रवाना



**कोझिकोड : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक फूटबॉल स्पर्धेला २० नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे. या पार्श्वभूमीवर कोझिकोडहून एक मोठा बूट फिफा विश्वचषकाचा भाग होण्यासाठी कोचीहून समुद्रमार्गे कतारला रवाना झाला आहे.

क्युरेटर एम. दिलीफ यांच्या टीमने आणि आयमॅक्स या भारतातील आघाडीच्या बिर्याणी तांदळाच्या कारखान्याच्या टीमने हा बूट तयार केला आहे. या बुटाची लांबी १७ फूट आणि वजन ५० किलो आहे.

या बूटाचे अनावरण कालिकतचे उपमहापौर मुझफ्फर अहमद आणि केरळ संघाचे माजी कर्णधार आसिफ साहिर यांच्या करण्यात आले. या कार्यक्रमास अनेक लोक कोझिकोड बीचवर उपस्थित होते. आयोजकांना वाटते की, हा बूट गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये स्थान मिळवेल.

केरळचे मंत्री अहमद डेव्हरकोविल म्हणाले, फिफा विश्वचषकासाठी मल्याळी लोकांकडून ही भेट आहे. मंजेरी येथील ब्राझिलियन फॅन क्लबचे सदस्य शाकीर यांनी म्हटले, विश्वचषक हंगाम हा नेहमीच एक असा हंगाम असता,. जिथे फुटबॉलचा उत्साह एका वेगळ्याच उंचीवर पोहचतो आणि संपूर्ण जिल्हा आणि लोक त्यात गुंतलेले असतात.

# विराट कोहली महान खेळाडू -रॉजर बिन्नी

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

यंदाच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने दोन विजयांसह गटात अव्वल स्थान पटकाविले आहे. या दोन्ही विजयांमध्ये एक गोष्ट समान आहे आणि ती म्हणजे टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहलीची जबरदस्त कामगिरी. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) नवे अध्यक्ष बनलेल्या रॉजर बिन्नी यांनी विराटचे खूप कौतुक केले आहे. ते शुक्रवारी कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशन (केएससीए) येथे त्यांच्या सत्कार समारंभात बोलत होते.

विराटच्या पाकिस्तानविरुद्धच्या खेळाबद्दल बोलताना बिन्नी म्हणाले, हे माझ्यासाठी स्वप्नासारखे होते. विराटने ज्या पद्धतीने चेंडू सीमापार पाठवले ते अविश्वसनीय होते. तो दणदणीत विजय होता. आम्ही असे बरेच सामने पाहिले नाहीत, जेव्हा बहुतेक वेळा पाकिस्तान भारतावर दबाव आणत असल्याचे दिसते, परंतु भारताने अचानक पुनरागमन केले आणि सामना जिंकला.

रॉजर बिन्नी यांनी पाकिस्तानविरुद्धच्या शानदार खेळीचे कौतुक करताना विराटशी संबंधित प्रश्नाला उत्तर देताना, तो महान खेळाडू असल्याचे सांगून त्याला काहीही सिद्ध करण्याची गरज नाही. तो जागतिक दर्जाचा खेळाडू आहे आणि त्याच्यासारखा खेळाडू दबावातही चांगली कामगिरी करतो.





दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com